पाक्षिक

# मनोगत

प्रदेश बीजेपी

मुंबई I वर्ष: 06 I अंक: 1 I 1 जानेवारी 2024 I पृष्ठसंख्या: 36 I किंमत: 5 रू.









विकसित भारत संकल्प यात्रा

# विकसित भारत संकल्प यात्रा







## अध्यक्षीय मनोगत

# विकसित भारताचा संकल्प

मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात २०१४ पासून गेल्या साडेनऊ वर्षात देशामध्ये मोठे परिवर्तन घडले आहे. पायाभूत सुविधा, विकास, गरीब कल्याण, देशाचे संरक्षण, आंतरराष्ट्रीय राजकारण अशा सर्व बाबतीत देशाने विलक्षण कामगिरी केली आहे. २०१४ साली जगात दहाव्या क्रमांकावर असलेली भारताची अर्थव्यवस्था आता इंग्लंड आणि फ्रान्स अशा देशांना मागे टाकून पाचव्या स्थानावर आली आहे. देशाची अर्थव्यवस्था आगामी पाच वर्षांत पहिल्या तीन स्थानांमध्ये असेल अशी गॅरंटी मोदीजींनी दिली आहे. मोदीजींच्या नेतृत्वात देशाचा झालेला विकास हा सर्वव्यापी आहे तसाच सर्वस्पर्शी आहे. समाजातील गरीब, मध्यमवर्गीय, महिला, युवक, शेतकरी, व्यावसायिक, कारागीर अशा सर्व घटकांना या विकास यात्रेत सामावून घेतले गेले आहे. अमृतकाळात भारताला विकसित देश करण्याचा आपला संकल्प आहे आणि त्यासाठी मोदीजींच्या नेतृत्वात आपण नक्की कामगिरी करू. मोदी सरकारने गेल्या साडेनऊ वर्षात सर्वसामान्य माणसासाठी केलेल्या विकासकामांची माहिती देणारी विकसित भारत संकल्प यात्रा देशात सर्वत्र चालू आहे. या यात्रेला जनसामान्यांचा खूप चांगला प्रतिसाद मिळत आहे. मोदीजींनी सर्वसामान्य माणसाचा आपुलकीने विचार केला आणि त्याला दिलासा दिला. प्रत्येक घराला नळाने पाणी, घरोघरी शौचालये, वीज कनेक्शन, गॅस कनेक्शन, प्रत्येकाचे बँकेत खाते, स्वतंत्र व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या प्रत्येकासाठी मुद्रा योजनेतून सहज कर्ज, प्रत्येक कुटुंबाला वार्षिक पाच लाख रुपयांपर्यंत आरोग्य उपचारांची हमी देणारी योजना अशी मोदी सरकारने सामान्य माणसासाठी केलेल्या कामांची यादी फार मोठी आहे. कोरोनाच्या संकटात भारत कोलमडून पडेल असे जागतिक पातळीवरील तज्ज्ञांना वाटले होते. पण प्रत्यक्षात मोदीजींच्या नेतृत्वात भारताने कोरोनाचा यशस्वी मुकाबला केला. कोरोनाचा सामना करण्यासाठी मोदी सरकारने राज्य सरकारांना सर्वतोपरी मदत केली. प्रत्येकाला कोरोना लस आणि ऐंशी कोटी लोकांना मोफत धान्य ही मोदी सरकारची कामगिरी ऐतिहासिक आहे. यामुळे सामान्य माणूस या भयानक संकटातून बचावला. विकसित भारत संकल्प यात्रेला सर्वसामान्य लोकांचा ठिकठिकाणी मिळणारा प्रतिसाद हा मोदी सरकारचे काम सर्वसामान्य लोकांपर्यंत किती प्रभावीपणे पोहोचले आहे, याचे निदर्शक आहे. आगामी काही महिन्यात लोकसभा निवडणूक होणार आहे. ही निवडणूक विकसित भारत घडविण्याच्या मोदीजींच्या गॅरंटीबद्दल आहे. मोदीजींना पुन्हा पंतप्रधान करणे म्हणजे भारताला विकसित देश बनविण्याची गॅरंटी आहे. भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्ता आणि देशाचा नागरिक म्हणून आपली जबाबदारी आहे की, देशाच्या विकासासाठी होणाऱ्या या निवडणुकीत आपली शक्ती पणाला लावणे आणि मोदीजींच्या नेतृत्वात लोकसभा निवडणुकीतील यशाची हॅटट्रिक करणे. या निवडणुकीतील भाजपाच्या यशामुळे देशाची विकासयात्रा पुढे चालू राहणार आहे आणि देश विकासाची नवी झेप घेणार आहे. भारतीय जनता पार्टीला या निवडणुकीत अनुकूल परिस्थिती आहे. तरीही कठोर परिश्रमाला पर्याय नाही. चला तर आता लोकसभा निवडणुकीपर्यंत संपूर्ण सामर्थ्यानिशी प्रयत्न करू आणि विजयाचा इतिहास घडवू. नववर्षाच्या सर्वांना शुभेच्छा.

**चंद्रशेखर बावनकुळे**

# अंतरंग





०४ विकसित भारत संकल्प यात>





०७ केंद्र सरकारच्या योजनांच्या लाभार्थ्यांचे अनुभव





०९ 'सरकारी योजना प्रत्येक गरजूपर्यंत पोहोचवणार'





१० आरोग्य शिबिरांमध्ये 1 कोटीपेक्षा अधिक नागरिक सहभागी





१२ कलम 370 हटवल्यानंतर काश्मीरमध्ये झालेले सकारात्मक बदल






१६ दहशतवाद संपून काश्मीर आता विकास यात्रेत सहभागी






संपादक : गणेश हाके

सल्लागार : माधव भांडारी
आ. अतुल भातखळकर

@manogatbjp 9767335402

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

**संपादकीय सल्लागार**

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

**विभागीय समन्वयक**

मराठवाडा (औरंगाबाद) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे

पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २५ येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपर्क : ०२२-२२०२२०५०

# विकसित भारत संकल्प यात्रा




> मोदी सरकारच्या १० वर्षात कोणत्या लोककल्याणकारी योजना केंद्र सरकारने राबवल्या त्याची माहिती देण्यासाठी सध्या विकसित भारत संकल्प यात्रा देशभर सुरु आहेत. या यात्रांत योजनांचे लाभार्थी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबरोबर व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे चर्चा करतात आणि आपले अनुभव सांगतात. या चर्चेवेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे लाभार्थ्यांना प्रश्न विचारतात.

**मुंबईत** मेघना नावाच्या एका सिंगल मदर लाभार्थी ताईंनी आपले अनुभव मोदींना सांगितले. त्या रस्त्यावर काहीतरी अन्नपदार्थ विकायच्या. नंतर त्यांना मुद्रा लोन आणि अन्य अनेक योजनांच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य मिळालं. मग त्यातून त्यांनी आपला व्यवसाय वाढवत नेला. सर्व कर्ज वेळेत फेडली. आज त्यांच्याकडे ३० महिला कामाला आहेत. त्यांचा मुलगा फ्रान्समध्ये केटरिंग कोर्सला आहे आणि त्यांची व्यावसायिक भरभराट होत आहे. या यात्रेमध्ये पंतप्रधान मोदी शेकडो लोकांसोबत बोलतात. गप्पा, प्रश्न, कौतुक आणि संवाद असा हा कार्यक्रम असतो. यातून हजारो लोक त्यांच्या कक्षेत येतात. आणि रोज त्यांचा लोकसंग्रह वाढत जातो. सत्तेवर आल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी केंद्र सरकारच्या अनेक योजनांच्या लाभार्थ्यांशी व्हिडिओ कॉन्फरन्सिंद्वारा अनेकदा संवाद साधला आहे. या संवादात पंतप्रधान मोदी हे लाभार्थ्यांना आलेल्या अडचणींविषयीही प्रश्न विचारतात. आजवर लक्षावधी लाभार्थी पंतप्रधान मोदी यांच्या थेट संपर्कात आले आहेत. यापुढील काळात केंद्र सरकारच्या कल्याणकारी योजनांपासून वंचित राहिलेल्या गरजूंना लाभार्थी करणे, त्याचबरोबर योजनांच्या अंमलबजावणीतील अडथळे, अडचणी जाणून घेणे हा विकसित भारत संकल्प यात्रेमागचा उद्देश आहे. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचा करिश्मा कसा वाढत गेला हे जाणून घेताना त्यांच्या या संवाद कौशल्याची नोंद घ्यावीच लागते.

गेल्या ९ वर्षात सरकारी योजनांचे लाभ थेट गरजूंपर्यंत पोहचवणारी यंत्रणा तयार करणारे पंतप्रधान मोदी त्याचवेळी लाभार्थ्यांशी स्वत:हून संवाद साधतात. यावेळी मोदी विरोधक काय करत असतात? मोदी जेव्हा आपल्या सरकारच्या कार्यक्षमतेला वाढवत लोकांना थेट आपल्याशी जोडत असतात त्याचवेळी त्यांचे राजकीय विरोधक आणि

डावे पुरोगामी वैचारिक विरोधक ईव्हीएमला दोष देण्यात मश्गूल असतात. मोदींना कडाडून विरोध करणारे विचारवंत, पत्रकार ही मंडळीही मोदी सरकारच्या योजनांचे लाभ गोरगरीब आणि गरजू वर्गापर्यंत थेट पोहचले आहेत, याकडे दुर्लक्ष करतात. स्वातंत्र्यानंतर अनेक वर्षे देशाची सत्ता उपभोगताना काँग्रेसला खऱ्या गरजू जनतेपर्यंत केंद्र सरकारच्या योजनांचे फायदे पोहचवण्यासाठी सक्षम यंत्रणा निर्माण करण्याची गरज कधीच वाटली नाही. सरकारच्या योजनांचे लाभ गरजूंपर्यंत पोहचत नाहीत, हे काँग्रेसच्या सत्ताधाऱ्यांना ठाऊक नव्हते, असे नाही. राजीव गांधी यांनी पंतप्रधान असताना १९८५ मध्ये काँग्रेसच्या शताब्दी अधिवेशनात सरकारच्या एक रुपयापैकी फक्त १० पैसे गरजूंपर्यंत जातात. उरलेले पैसे मध्यस्थ आणि दलालांच्या खिशात जातात, असे विधान केले होते. मात्र काँग्रेसला गरजूंपर्यंत शतप्रतिशत लाभ पोहचवणारी प्रणाली निर्माण करण्यासाठी कष्ट घेण्याची गरज वाटली नाही. नरेंद्र मोदी आणि काँग्रेस नेतृत्वातील हा फरक. विचारवंत, पत्रकारांना नोंद घ्यावासा वाटत नाही. विरोधक फक्त मोदी विरोधाचे राजकारण करत असताना दुसरीकडे विकसित भारत संकल्प यात्रेसारख्या अभिनव संवाद कार्यक्रमाचा अवलंब होत आहे.

सध्या मराठी डावे पुरोगामी (डापु) मुंबईला मोदी सरकार केंद्रशासित प्रदेश करणार आणि त्यावर कोर्ट सुद्धा ३७० सारखं सरकारला पाठिंबा देणार हे सांगण्यात गुंतलेले आहेत. भावनात्मक मुद्दे उपस्थित करून आपला जनाधार वाढवण्याची धडपड करणाऱ्या विरोधकांना विकसित भारत संकल्प यात्रेसारखे विधायक कार्यक्रम नजरेआड करण्यात काहीच गैर वाटत नाही. केवळ लाभार्थ्यांशी नव्हे तर खेळाडू, लष्काराचे सैनिक, विकास प्रकल्पातील कर्मचारी यांच्याबरोबरही पंतप्रधान मोदी सहजपणे संवाद साधतात. ऑलिंपीक, राष्ट्रकूल, आशियाई या स्पर्धांमध्ये भाग घेऊन पदक मिळवणाऱ्या खेळाडूंशी पंतप्रधान जातीने संवाद साधतात. त्याचबरोबर या स्पर्धांमध्ये पदक न मिळालेल्या खेळाडूंशीही ते आस्थेवाईकपणे बोलतात. काही दिवसांपूर्वी उत्तराखंडमध्ये बोगद्यात अडकलेल्या श्रमिकांची अथक प्रयत्नानंतर सुटका झाली. सुटकेनंतर लगेचच पंतप्रधानांनी या श्रमिकांशी संवाद साधला होता. देशाचा प्रमुख आपली दखल घेतो, आपलं कौतुक करतो हे जाणवल्यावर



## मुद्रा, स्वनिधी योजनांचा लाभ मिळालेल्या मुंबईतील मेघना गुरव

***पंतप्रधान मोदी यांच्याशी संवाद साधताना मुंबईतील मेघना गुरव. विकसित भारत संकल्प यात्रेतील संवाद कार्यक्रमात पंतप्रधानांनी मुंबईत कांदिवली येथे राहणाऱ्या मेघना गुरव यांच्याशी संवाद साधत त्यांची माहिती घेतली. विविध योजनांमुळे मेघना यांच्यासह त्यांच्या बचतगटातील इतर स्त्रियांच्याही जीवनमानात सुधारणा झाल्याचे स्पष्ट झाले. पूर्वी पदपथावर खाद्यपदार्थांचा व्यवसाय करणाऱ्या मेघना यांना मुद्रा योजनेतून कॅनरा बँकेमार्फत मिळालेल्या ९० हजार रुपयांच्या कर्जाने, त्यांच्या आयुष्याला कलाटणी मिळाली. आवश्यक ती सामग्री विकत घेऊन त्यांनी एकटीच्या हिंमतीवर व्यवसायाचा पसारा वाढवला. त्यानंतर मंजूर झालेल्या शैक्षणिक कर्जाच्या मदतीने त्यांच्या मुलाला परदेशी शिक्षणासाठी पाठवता आल्यामुळे 'एक एकल माता' म्हणून आपल्याला मोठे समाधान मिळाले, असे मेघना गुरव यांनी यावेळी सांगितले. मेघना यांनी पीएम स्वनिधी योजनेतून कर्जाची उचल केली. योजनेची संपूर्ण माहिती त्यांना असल्याने हप्ते वेळेवर भरणाऱ्यास पुढे पुढे कमी दराने मिळणाऱ्या अधिक कर्जाची माहितीही त्यांना होती. व्यवसायवृद्धीच्या दृष्टीने त्यांनी तशा अधिक कर्जाची उचल करण्याचे नियोजनही केले आहे. मेघना यांनी केंद्र सरकारच्या योजनांच्या मदतीने स्वतःचा संसार सावरण्याबरोबरच बचत गटातील २५ भगिनींना काम दिले. पीएम कौशल्य विकास योजनेद्वारे या स्त्रियांनी शिवणकामाचे प्रशिक्षण घेतले व आता त्या जोरावर त्यांना ठिकठिकाणची शिवणाची कामे तर मिळतातच, पण त्यांनी केलेल्या रजया परदेशातही जातात, हे ऐकून पंतप्रधानांनी त्यांची विशेष प्रशंसा केली.***

## बचत गटाकडून कर्ज घेऊन उद्योजक बनलेल्या रुबिना खान





**देशातील बचतगटांशी संबंधित दोन कोटी महिलांना लखपती बनवायचे आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले. मध्य प्रदेशातील देवास जिल्ह्यात सुरू असलेल्या विकास भारत संकल्प यात्रेअंतर्गत विविध सरकारी कार्यक्रमांच्या लाभार्थ्यांशी पंतप्रधान आभासी संवाद साधत होते. मोदींनी रुबिना खान नावाच्या महिलेशी चर्चा केली. यावेळी मोदींनी महिलांना लखपती व्हायचे असल्यास हात वर करण्यास सांगितले, त्यानंतर सर्वांनी हात वर करत प्रतिसाद दिला. पंतप्रधान म्हणाले की, आमच्याकडे महिलांसाठी खूप काम आहे, अशा उपक्रमांमध्ये त्यांना पाठिंबा द्यायला हवा. त्यावर पंतप्रधानांची स्वप्ने सत्यात उतरवण्यासाठी सर्व जण काम करतील, असे सर्वांनी उत्तर दिले.**

### मोदींनाही आश्चर्य...

**रुबिना म्हणाल्या की, कोरोनामध्ये मास्क, सॅनिटायझर आणि किट बनवण्याचा निर्णय घेतला आणि त्यातून प्रत्येक महिलेने ६० ते ७० हजार रुपयांची कमाई केली. हे ऐकून मोदींनाही आश्चर्य वाटले. पंतप्रधानांनी रुबिनाला तिच्या मुलांबद्दल विचारले, ज्यावर तिने सांगितले की तिच्या दोन मुली दहावीपर्यंत शिकल्या आहेत आणि बेरोजगार मुलासाठी कार खरेदी केल्याचेही रुबिनाने सांगितले.**

### माझ्याकडे सायकलही नाही...

**रुबिनाने पंतप्रधानांना सांगितले की, बचत गटातून ५ हजारांचे कर्ज घेतले आणि पतीसोबत मोटरसायकलवर कपडे विकायला सुरुवात केली. जेव्हा तिचे काम वाढले तेव्हा तिने आणि तिच्या पतीने सेकंडहँड मारुती व्हॅन घेण्याचे ठरवले. यावर मोदी म्हणाले की, तुमच्याकडे मारुती व्हॅन आहे, तर माझ्याकडे सायकलही नाही. यावर महिला पुन्हा हसायला लागल्या. रुबिनाने सांगितले की, तिचा व्यवसाय वाढला असून तिने देवास येथे दुकान घेतले असून आता ती चांगले काम करत आहे.**

सामान्य माणसाचा राष्ट्र उभारणीतील उत्साह आणखी वाढतो. या संवाद कार्यक्रमातून मोदींच्या खात्यातील जमा वाढतच जाते. हे 'मोदीनॉमिक्स' भाजपा विरोधकांच्या डोक्यावरून जाते. देशाचा पंतप्रधान थेट हजारो लोकांशी सहजतेने स्वतःला जोडून घेत असताना तो कसा हुकूमशहा आहे, तो संविधान कशा पद्धतीने धोक्यात घालत आहे वगैरे वगैरे गोष्टीशी जनतेला काही एक देणंघेणं नसतं. तरीही अशा थापा मारण्यात विरोधक स्वमग्न आहेत.

लोकांचे प्रश्न काय आहेत आणि त्याला मोदी, शहा काय उत्तरे आणत आहेत याचा यांना पत्ताच नाही! शिवाय डाव्या पुरोगामी (डापु) गुऱ्हाळाला कुणी तर्कशुद्ध मांडणी करून खोडून काढलं की त्याला व्हॉट्सप युनिव्हर्सटी म्हणून हलक्यात काढून आपल्याच भावविश्वात रमून जायचं हा यांचा छंद आहे. कर्नाटकातील यशानंतर राहुलबाबाच्या एका यात्रेने अख्खी लोकसभा आपण मारू शकतो या भ्रमात असताना त्यांना विधानसभा निवडणुकीचा झटका बसला. आता त्यातून सावरायला त्यांना वेळ नाही.

पंतप्रधान मोदी यांनी सांगितले की, 'मोदी की गॅरंटी' गाडी ज्या-ज्या भागात जात आहे, तिथल्या लोकांचा विश्वास वाढत आहे आणि लोकांच्या आशा पूर्ण होत आहेत. विकसित भारत संकल्प यात्रेदरम्यान उज्ज्वला गॅस कनेक्शनसाठी ४.५ लाख नवीन अर्ज दाखल करण्यात आले आहेत, तर १ कोटी आयुष्मान कार्ड जारी करण्यात आले आहेत, १.२५ कोटी जणांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे. ७० लाख लोकांची क्षयरोग तपासणी करण्यात आली आहे आणि १५ लाख सिकलसेल ॲनिमिया म्हणजे रक्ताल्पता आजाराविषयीच्या चाचण्या करण्यात आल्या आहेत. एबीएचए- आभा कार्ड एकाचवेळी दिल्यामुळे लाभार्थ्यांच्या वैद्यकीय नोंदी तयार होणार आहेत. यामुळे संपूर्ण देशात आरोग्याबाबत नवीन जागरूकता निर्माण होणार आहे. सरकार खेड्यातील महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यासाठी एक मोठी मोहीम राबवत आहे.

# केंद्र सरकारच्या योजनांचा लाभ घेऊन बुटिक सुरू करणा-या काश्मीरमधील इन्शा शाबीर

जम्मू आणि काश्मीरच्या पुलवामा जिल्ह्यातील निसर्ग सौंदर्याने नटलेल्या खोऱ्यात राहणाऱ्या एका तरुण महिलेची ही गोष्ट आहे. आत्मनिर्भरता आणि परिवर्तनाचे प्रतीक बनलेल्या पुलवामातील अरिगाम येथे एका सामान्य कुटुंबात जन्मलेल्या इन्शा शाबीर आज स्वतःच्या व्यवसायाच्या मालक बनल्या आहेत. त्या स्वतःचे बुटीक चालवतात.

**केंद्र** सरकारच्या दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियानाच्या अनेक लाभार्थ्यांपैकी त्या एक आहेत. इन्शा, आपल्या सारख्या अनेक मुली आणि महिलांना यशाच्या मोकळ्या आकाशात भरारी मारण्यासाठी प्रेरणा देत आहेत. सध्या सुरू असलेल्या विकसित भारत संकल्प यात्रेदरम्यान प्रसारमाध्यमांना इन्शा यांनी मुलाखत दिली. पहिल्यांदा २०१७ मध्ये दीनदयाळ अन्त्योदय योजना-राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियानाबद्दल ऐकले आणि लगेचच त्यासाठी नोंदणी केली असे त्यांनी सांगितले. ग्रामीण भागातील गरीबांसाठी कार्यक्षम आणि प्रभावी संस्थात्मक मंच तयार करणे, शाश्वत उपजीविकेच्या वाढीद्वारे आणि आर्थिक सेवांमध्ये सुधारित प्रवेशाद्वारे त्यांना कौटुंबिक उत्पन्न वाढवण्यास सक्षम करणे हा यामागचा उद्देश आहे.

इन्शा यांनी आपले मनोगत सांगितले. लहानपणापासूनच डिझायनिंग आणि कपडे बनवण्यात त्यांना रुची आहे. पण आयुष्यात निर्णायक वळण तेव्हा आले जेव्हा त्यांनी डी. ए. वाय.-एन. आर. एल. एम. अंतर्गत स्थानिक शिवणकाम कार्यशाळेत प्रवेश घेतला. मग त्यांची प्रतिभा आणि आवड, व्यवसायाच्या संधीत तसेच उपजीविकेच्या मार्गात



रूपांतरित झाली. डिजाईन संदर्भातील अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर इन्शा यांच्या लक्षात आले की त्यांना बुटीक उभारायचे आहे. त्यांना पी. एम. ई. जी. पी. उमेद कर्ज मिळाले. सोबतच डी. ए. वाय.-एन. आर. एल. एम. ने आर्थिक सहाय्य पुरवून मदत केली. अखेरीस, त्यांना स्वतःचे बुटीक उभारता आले. कधीकधी, मर्यादित संसाधने आणि कमी संधी असल्या की, स्वप्ने अनेकदा रात्रीच्या आकाशातील दूरच्या ताऱ्यांसारखी दिसतात. पण, डी. ए. वाय.-एन. आर. एल. एम. ने इन्शा यांना आपली स्वप्न जगण्यास सक्षम केले. या योजनेअंतर्गत अनुदानित कर्ज मिळाले नसते तर कदाचित त्या व्यवसाय सुरू करू शकल्या नसत्या असे इन्शा यांनी सांगितले. तरुणांना मदत करणाऱ्या आणि नवीन, विकसित भारताची निर्मिती करणाऱ्या सरकारच्या व्यावसायिक योजनांची इन्शा यांनी प्रशंसा केली. त्या पुढे म्हणाल्या की, आज केवळ श्रीमंत लोकच यशस्वी होत नाहीत तर गरीब पार्श्वभूमी असलेल्या आणि खेड्यांमधील व्यक्ती देखील यशस्वी व्यवसाय सुरू करत आहेत. आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यास मदत करणाऱ्या योजना आणल्याबद्दल सरकारची आभारी असल्याचे त्यांनी सांगितले. इन्शा, आज केवळ त्यांचे आर्थिक व्यवस्थापनच करत नाही तर आपल्या बुटिकमध्ये इतर महिलांना रोजगारही देत आहेत. जरी हे बुटीक लहान असले तरी विकास आणि आत्म निर्भरतेचे ते निदर्शक बनले आहे.

**कुंभार समाजातील महिला उद्योजिका विश्वकर्मा योजना आणि भरड धान्याबाबत करत आहेत जनजागृती**

कोटा राजस्थान येथील सपना प्रजापती या स्वनिधि योजनेच्या लाभार्थी असून महामारीच्या काळात त्यांनी

## मत्स्य संपदा योजनेमुळे हरिद्वारच्या शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट

*हरिद्वारमधील गुरुदेव सिंग हे शेतकरी आहेत आणि ते मत्स्यव्यवसायही करतात. मत्स्य संपदा योजनेचा लाभ घेतल्यामुळे उत्पन्न दुप्पट कसे झाले याची माहिती त्यांनी पंतप्रधानांना दिली. आधी एक एकर जमिनीतून ६० हजार रुपये कमावत होतो, आता मासेमारीच्या जोडधंद्यातून तितक्याच जमिनीतून दीड लाख रुपये कमवू शकत असल्याचे त्यांनी सांगितले. सरकारी योजनांचा अभ्यास करत, कल्पकता दाखवल्याबद्दल पंतप्रधानांनी त्यांची प्रशंसा केली. पशुपालन, मत्स्यपालन, मध उत्पादन याद्वारे शेतीचे उत्पन्न वाढवण्याच्या उपयुक्ततेचा पंतप्रधानांनी पुनरुच्चार केला. हरित, श्वेत (दुग्ध) क्रांतीसह मधु क्रांती आणि नील क्रांतीच्या महत्त्वावरही त्यांनी भर दिला. रुबिनाने पंतप्रधानांना सांगितले की, बचत गटातून ५ हजारांचे कर्ज घेतले आणि पतीसोबत मोटरसायकलवर कपडे विकायला सुरुवात केली. जेव्हा तिचे काम वाढले तेव्हा तिने आणि तिच्या पतीने सेकंडहँड मारुती व्हॅन घेण्याचे ठरवले. यावर मोदी म्हणाले की, तुमच्याकडे मारुती व्हॅन आहे, तर माझ्याकडे सायकलही नाही. यावर महिला पुन्हा हसायला लागल्या. रुबिनाने सांगितले की, तिचा व्यवसाय वाढला असून तिने देवास येथे दुकान घेतले असून आता ती चांगले काम करत आहे.*

मास्क तयार करून योगदान दिले. डिजिटल व्यवहारांद्वारे बहुतांश व्यवसाय चालवत असल्याबद्दल पंतप्रधानांनी त्यांचे कौतुक केले. स्थानिक खासदार आणि लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनीही त्यांना जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रोत्साहन दिले. सपना यांच्या गटातील समहिला भरड धान्याचा प्रसार आणि त्याची उत्पादने तयार करत असल्याबद्दल पंतप्रधानांनी आनंद व्यक्त केला. पंतप्रधानांनी 'कुंभार' समाजातील उद्योजिकेला विश्वकर्मा योजनेबद्दल सांगितले. तुमची सामूहिक मातृशक्ती तुम्हाला नव्या उंचीवर घेऊन जाईल आणि मी तुम्हा सर्व दीदींना आवाहन करतो की तुम्ही लोकांना विविध योजनांचे मिळणारे फायदे सांगून मोदी की गॅरंटी की गाडी यशस्वी बनवा, असे ते म्हणाले.

### आवास योजनेमुळे चहाच्या मळ्यातील कामगाराच्या जीवनात झाले परिवर्तन

पीएम आवास, उज्ज्वला, मोफत शौचालयाचे लाभार्थी असलेले त्रिपुरातील चहाच्या मळ्यात काम करणारे अर्जुन सिंह यांना १.३ लाख रुपयांची मदत मिळाल्यानंतर ते कच्च्या घरातून पक्क्या घरात रहायला गेले आणि चुलीच्या जागी गॅसची शेगडी मिळाल्यामुळे त्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडून आला. मोदी की गारंटीच्या गाडीबद्दल त्यांच्या गावात आणि आसपासच्या भागात उत्सुकता असल्याची माहिती त्यांनी पंतप्रधानांना दिली. सरकारी योजनांचा लाभ लाभार्थ्यांना मिळताना फारशी अडचण येत नाही याबद्दल पंतप्रधानांनी समाधान व्यक्त केले.

**तिरुवल्लूर येथील शेतकऱ्याची आधुनिक शेती**

*पंतप्रधानांनी तिरुवल्लूर येथील शेतकरी हरिकृष्ण यांचे 'वणक्कम' म्हणून स्वागत केले. थिरू हरिकृष्णन यांना फलोत्पादन आणि कृषी विभागाकडून प्रशिक्षण देण्यात आले आहे. चांगले शिक्षण घेतल्यानंतर शेती व्यवसायाकडे वळणाऱ्या सुशिक्षित शेतकऱ्याचे पंतप्रधानांनी कौतुक केले. शेतकरी कल्याणाशी संबंधित बहुतांश सरकारी योजना आणि आयुष्मान भारत योजनेचे हरिकृष्ण लाभार्थी आहेत. नॅनो युरियासारखी नाविन्यपूर्ण योजना आणल्याबद्दल त्यांनी पंतप्रधानांचे कौतुक केले. तसेच हरिकृष्ण आपल्या कृषिकार्यात ड्रोन आणि इतर आधुनिक साधनांचा वापर करतात. शेती करताना, आधुनिक पद्धतींचा अवलंब करत असल्याबद्दल शेतकऱ्यांचे कौतुक करताना पंतप्रधान म्हणाले, सरकार नेहमीच तुमच्या पाठीशी उभे आहे.*

ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी, भारत सरकार गावातील महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यासाठी एक मोठी मोहीम राबवत आहे. गेल्या काही वर्षांत देशातील सुमारे १० कोटी भगिनी, मुली आणि दीदी बचतगटांमध्ये सहभागी झाल्या आहेत. या भगिनी-मुलींना बँकांनी साडेसात लाख कोटी रुपये दिले. देशात बचतगटांच्या दीदींना बँकांच्या माध्यमातून साडेसात लाख कोटी रुपये त्यांच्या हातात मिळवून देणे त्यांना याची मदत होणे म्हणजे क्रांतिकारी काम होत आहे. ■

# 'विकसित भारत संकल्प यात्रा' द्वारे सरकारी योजना प्रत्येक गरजूपर्यंत पोहोचवणार

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २७ डिसेंबर रोजी दूरदृश्य प्रणालीद्वारे विकसित भारत संकल्प यात्रेच्या लाभार्थ्यांशी संवाद साधला.



**यावेळी** बोलताना पंतप्रधान म्हणाले, विकसित भारताच्या संकल्पाशी जोडली जाण्याची ही मोहीम सातत्याने विस्तारत आहे. विकसित भारत संकल्प यात्रा सुरू होऊन ५० दिवसही झाले नाहीत, परंतु आतापर्यंत ही यात्रा २.२५ लाख गावांमध्ये पोहोचली आहे. हाच एक विक्रम आहे. हा उपक्रम यशस्वी केल्याबद्दल त्यांनी सर्वांचे, विशेषतः महिला आणि युवकांचे आभार मानले. ते म्हणाले, विकसित भारत संकल्प यात्रेचे उद्दिष्ट अशा व्यक्तीपर्यंत पोहोचणे आहे, जी काही कारणास्तव भारत सरकारच्या योजनांपासून वंचित राहिली आहेत. लोकांपर्यंत सक्रियपणे पोहचण्याचा उद्देश म्हणजे त्यांना याची खात्री पटवून देणे की सरकारी योजना सर्वांसाठी उपलब्ध आहेत आणि कोणत्याही प्राधान्य किंवा भेदभावाशिवाय उपलब्ध आहेत. मी अशा लोकांचा शोध घेत आहे जे योजनांच्या लाभापासून वंचित राहिले आहेत, असे त्यांनी नमूद केले. पंतप्रधानांनी लाभार्थ्यांमधील अभूतपूर्व आत्मविश्वासाची दखल घेतली. पंतप्रधान म्हणाले की, हे लाभ लाभार्थ्यांना त्यांचे जीवन अधिक चांगले बनवण्यास मदत करत आहेत. आज देशातील लाखो लाभार्थी पुढे जाण्यासाठी सरकारी योजनांचा वापर करत आहेत. असे ते म्हणाले, ते म्हणाले की, 'मोदी की गॅरंटी'गाडी ज्या-ज्या भागात जात आहे, तिथल्या लोकांचा विश्वास वाढत आहे आणि लोकांच्या आशा पूर्ण होत आहेत. त्यांनी माहिती दिली की, व्हीबीएसवाय म्हणजेच विकसित भारत संकल्प यात्रेदरम्यान उज्ज्वला गॅस कनेक्शनसाठी ४.५ लाख नवीन अर्ज दाखल करण्यात आले आहेत, तर १ कोटी आयुष्मान कार्ड जारी करण्यात आले आहेत, १.२५ कोटी जणांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे. ७० लाख लोकांची क्षयरोग तपासणी करण्यात आली आहे आणि १५ लाख सिकलसेल ॲनिमिया म्हणजे रक्तालपता आजाराविषयीच्या चाचण्या करण्यात आल्या आहेत. एबीएचए- आभा कार्ड एकाचवेळी दिल्यामुळे लाभार्थ्यांच्या वैद्यकीय नोंदी तयार होणार आहेत, अशी माहितीही त्यांनी दिली. यामुळे संपूर्ण देशात आरोग्याबाबत नवीन जागरूकता निर्माण होणार आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. सरकारच्या अनेक योजनांचा लाभ आता आणखी नवीन लोकांना लाभ मिळत असल्याचे पंतप्रधानांनी निदर्शनास आणून दिले. त्यामुळे आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींच्या जबाबदारीमध्ये वाढ झाली आहे. त्यांना गाव, प्रभाग, शहर आणि परिसरातील प्रत्येक पात्र व्यक्तीची ओळख पटवून, त्या व्यक्तींना सुविधांचे लाभ देण्यास सांगण्यात आले आहे. गेल्या काही वर्षांत देशातील सुमारे १० कोटी भगिनी, कन्या आणि दीदी आपल्या भागातील स्वयं-सहायता गटांमध्ये सामील झाल्या आहेत. या भगिनी आणि मुलींना बँकांकडून ७.५ लाख कोटी रुपयांहून जास्त मदत देण्यात आली आहे. या मोहिमेचा आणखी विस्तार करण्यासाठी आपण पुढील तीन वर्षांत २ कोटी लखपती दीदी तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, अशी घोषणा पंतप्रधानांनी केली. ग्रामीण महिलांचा आत्मविश्वास वाढवणाऱ्या 'नमो ड्रोन दीदी योजने' चाही त्यांनी उल्लेख केला. ■

# संकल्प यात्रेतील आरोग्य शिबिरांमध्ये 1 कोटीपेक्षा अधिक नागरिक सहभागी

देशभरात सध्या सुरु असलेल्या विकसित भारत संकल्प यात्रेच्या उपक्रमाअंतर्गत देशातील ३,१५६ ग्राम पंचायती तसेच शहरी स्थानिक संस्थांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या ६५,३४८ आरोग्य शिबिरांमध्ये आतापर्यंत एकूण १,०३,५५,५५५ नागरिक सहभागी झाले. या आरोग्य शिबिरांमध्ये खालील उपक्रम राबवण्यात येत आहेत.



**आयुष्मान भारत- पंतप्रधान जन आरोग्य योजना (एबी-पीएमजेएवाय):** विकसित भारत संकल्प यात्रेनिमित्त केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयातर्फे राबवण्यात येत असलेल्या महत्त्वाच्या सरकारी कार्यक्रमाअंतर्गत, आयुष्मान ॲपचा वापर करून नागरिकांची आयुष्मान कार्डे तयार करण्यात येत आहेत तसेच लाभार्थ्यांना या भौतिक स्वरूपातील कार्डांचे प्रत्यक्षात वितरण करण्यात येत आहे. आतापर्यंत १९,०३,२०० कार्डांचे प्रत्यक्षात वाटप करण्यात आले आहे. काल दिवसभरात या आरोग्य शिबिरांमध्ये एकूण ५,३१,०२५ आयुष्मान कार्डे तयार करण्यात आली. आतापर्यंत या शिबिरांमध्ये एकूण ८४,२७,५०० कार्डे तयार करण्यात आली आहेत.

**क्षयरोग (टीबी):** या शिबिरांना भेट देणाऱ्या लोकांपैकी काहींना क्षयरोगाची लागण झाल्याची शक्यता तपासण्यासाठी, त्यांची लक्षणे, थुंकीची तपासणी तसेच जेथे एनएएटी यंत्रे उपलब्ध आहेत, तेथे या यंत्रांच्या सहाय्याने चाचण्या करण्यात येत आहेत. क्षयरोग झाला आहे अशी शंका येत असलेल्या लोकांना अधिक उच्च स्तरावरील आरोग्य सुविधा केंद्रांकडे वर्ग करण्यात आले आहे. या यात्रेच्या ३४ व्या दिवशी, क्षयरोगाची शक्यता तपासण्यासाठी ३६,४८,७०० लोकांची तपासणी करण्यात आली आणि त्यापैकी २,६३,००० लोकांना उपचाराच्या अधिक उच्च स्तरावरील सुविधा असणाऱ्या आरोग्य केंद्रांकडे पाठवण्यात आले.

पंतप्रधान क्षयरोगमुक्त भारत अभियाना (पीएम टीबीएमबीए) अंतर्गत, निक्षय मित्रांकडून मदत मिळण्याच्या संदर्भात क्षयरोग झालेल्या रुग्णांकडून संमती घेण्यात येत आहे. आरोग्य शिबिरांमध्ये सहभागी झालेल्यांपैकी ज्यांना निक्षय मित्र म्हणून काम करण्याची इच्छा असेल त्यांची त्याचवेळी नोंदणी करून घेण्यात येत आहे. आतापर्यंत या शिबिरांमध्ये १,१९,५०० रुग्णांनी पीएमटीबीएमबीए अंतर्गत उपचारांसाठी संमती दिली आहे आणि ४६,७०० हून अधिक नव्या निक्षय मित्रांची नोंदणी करण्यात आली आहे.

निक्षय पोषण योजने (एनपीवाय) अंतर्गत, क्षयरोगाच्या रुग्णांना थेट लाभ हस्तांतरणाच्या माध्यमातून आर्थिक मदत देण्यात येत आहे. यासाठी, मदत प्रलंबित राहिलेल्या लाभार्थ्यांच्या बँक खात्याचे तपशील संकलित करण्यात येत आहेत आणि बँक खात्यांना आधार क्रमांकांशी


अंदमान आणि निकोबार बेटे


पल्नाडू, आंध्रप्रदेश


अप्पर सियांग, अरुणाचल प्रदेश


उडलगुरी, आसाम


रोहतक, हरियाणा

जोडण्यात येत आहे. अशा ३१,३०० लाभार्थ्यांचे तपशील संकलित करण्यात आले आहेत.

**सिकल सेल आजार:** प्रामुख्याने आदिवासींची लोकसंख्या असलेल्या भागांमध्ये, सिकल सेल आजारासाठीची पॉईंट ऑफ केअर (पीओसी) किंवा विद्राव्यता चाचणी यांच्या माध्यमातून पात्र लोकसंख्येमध्ये (४० वर्षांपर्यंत वय असलेले नागरिक) सिकल सेल आजाराची (एससीडी) शक्यता तपासण्यात येत आहे. चाचण्यांतून एससीडी आहे असे निदान झालेल्यांना आजाराच्या व्यवस्थापनासाठी वरच्या पातळीवरील आरोग्य केंद्रांकडे वर्ग करण्यात आले आहे. आतापर्यंत, ३,८३,००० लोकांची एससीडीसाठी तपासणी करण्यात आली असून त्यापैकी १८,३०० जणांना एससीडी आहे असे निदान हाती आल्याने या लोकांना उच्च स्तरावरील सार्वजनिक आरोग्य सुविधा केंद्रांकडे वर्ग करण्यात आले आहे.

**अ-संसर्गजन्य आजार (एनसीडीज):** रक्तदाब आणि मधुमेह यांसारखे आजार होऊ शकणाऱ्या लोकांची (वय वर्षे ३० आणि त्याहून अधिक वय असलेल्या) या रोगांच्या शक्यतेसाठी तपासणी करण्यात आली आणि यापैकी एखादा आजार झाला आहे असा संशय असलेल्या रुग्णांना अधिक सुविधा असणाऱ्या आरोग्य केंद्रांकडे पाठवण्यात आले. रक्तदाब आणि मधुमेह या रोगांची शक्यता तपासण्यासाठी सुमारे ८१,१५,५०० लोकांची तपासणी करण्यात आली. यापैकी ३,७४,००० हून अधिक व्यक्तींना रक्तदाबाचा विकार असल्याची तसेच २,६९,८०० हून अधिक व्यक्तींना मधुमेह असल्याची शंका व्यक्त करण्यात आली आणि ५,९९,२०० व्यक्तींना उच्च स्तरावरील सार्वजनिक आरोग्य सुविधा केंद्रांकडे वर्ग करण्यात आले.

**पार्श्वभूमी:** केंद्र सरकारी योजनांचा लाभ देशभरातील अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी झारखंडमधील खुंटी येथून दिनांक १५ नोव्हेंबरपासून विकसित भारत संकल्प यात्रेचा प्रारंभ केला. या विकसित भारत संकल्प यात्रेच्या उपक्रमाअंतर्गत प्रत्यक्ष स्थळी उपलब्ध करून देण्यात आलेल्या सेवांचा भाग म्हणून, ज्या ग्राम पंचायतींमध्ये आयईसी व्हॅन्सना थांबा दिलेला आहे, तेथे आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. ■

# कलम 370 हटवल्यानंतर काश्मीरमध्ये झालेले सकारात्मक बदल

> काश्मीरसाठीचे ३७० वे कलम रद्द करण्याच्या मोदी सरकारच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे. मोदी सरकारने जम्मू-काश्मीरच्या विकासाला गती देत 'सबका साथ, सबका विकास' ही आपली घोषणा प्रत्यक्षात आणली आहे. काँग्रेस आणि अब्दुल्ला-मुफ्ती घराण्याच्या कार्यकाळात काश्मीरच्या विकासाकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले होते.

**चार वर्षांत अर्थव्यवस्था दुप्पट**

जम्मू-काश्मीरमधील कलम ३७० रद्द केल्यापासून चार वर्षात जीडीपीमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. अधिकृत आकडेवारीनुसार, जम्मू आणि काश्मीरचा GSDP दुप्पट होऊन २.२५ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त झाली आहे, जी ऑगस्ट २०१९ मध्ये कलम ३७० रद्द करण्यापूर्वी १ लाख कोटी रुपये होती. अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांची वाढ आणि सामाजिक-आर्थिक विकास मोजण्यासाठी GSDP हा एक महत्त्वाचा सूचक आहे. यातून अर्थव्यवस्था आणि लोकांचे जीवनमान प्रतिबिंबित होते.

६ डिसेंबर २०२३ रोजी संसदेत जम्मू आणि काश्मीर आरक्षण (दुरुस्ती) विधेयक, २०२३ आणि जम्मू आणि काश्मीर पुनर्रचना (सुधारणा) विधेयक, २०२३ वरील चर्चेला उत्तर देताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले की, कलम ३७० रद्द करण्यापूर्वी जीएसडीपी १ लाख कोटी रुपये होते. अवघ्या चार वर्षांत हा आकडा दुप्पट होऊन आज २,२७,९२७ कोटी रुपये झाले आहे. कलम ३७० हटवल्यानंतर काश्मीरमध्ये दहशतवाद कमी झाला आहे, त्यामुळे तेथे चांगले वातावरण निर्माण झाले असून मोठा विकास होत आहे.



काश्मीरमध्ये जागतिक दर्जाचे राष्ट्रीय महामार्ग, उड्डाणपूल बांधले जात आहेत. (वरील छायाचित्र जम्मू रिंग रोडचे)

केंद्रशासित प्रदेशाच्या २०२२-२३ च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार, उद्योग, कृषी, फलोत्पादन, पर्यटन आणि सेवा क्षेत्रांवर भर देऊन जम्मू आणि काश्मीरचा GSDP पुढील पाच वर्षांत दुप्पट होण्याची शक्यता आहे. या वर्षाच्या सुरुवातीला प्रसिद्ध झालेल्या अहवालात म्हटले आहे की, जम्मू-काश्मीरची अर्थव्यवस्था अलिकडच्या वर्षांत राष्ट्रीय सरासरीपेक्षा वेगाने वाढली आहे. जागतिक दर्जाचे राष्ट्रीय महामार्ग, द्रुतगती मार्ग, बोगदे, पूल, उड्डाणपूल, रिंग रोड बांधले जात आहेत, तर अहवालानुसार, २०२३ मध्ये जम्मू आणि काश्मीरचा रेल्वे मार्ग राष्ट्रीय नेटवर्कशी जोडला जाण्याची अपेक्षा आहे आणि विमानतळ देखील अपग्रेड केले जातील.

**३७० वे कलम रद्द झाल्यानंतर काश्मीरच्या विकासाला वेग**

पश्चिम पाकिस्तानातून ज्यांना परागंदा व्हावे लागले व जे जम्मू-काश्मिरात आश्रयाला आले अशा हजारो गोरखा, वाल्मिकी आणि मुस्लीम समुदायांनाही आता ७२ वर्षांनंतर नागरिकत्व मिळाले आहे. शिवाय लोकतांत्रिक व्यवस्थेची सर्वसमावेशकता, पारदर्शिता आणि उत्तरदायित्व यांना बळकटी देणारे विविध ३७ राष्ट्रीय कायदे जम्मू-काश्मीरने स्वीकारले नव्हते, ते आता लागू झाले आहेत. यात भ्रष्टाचार प्रतिबंधन, जीएसटी, दिवाळखोरीविषयक कायदा, भारतीय दंड विधान व कोड ऑफ क्रिमिनल प्रोसिजर

आदी अनेक कायद्यांचा समावेश आहे.

गेल्या वर्षभरात दहशतवाद्यांकडून निष्पाप नागरिकांची हत्या होण्याच्या घटनांना पायबंद बसला आहे. गेल्या सहा महिन्यांत अशा हत्यांची संख्या २२ आहे, तर वर्षभरात दहशतवाद्यांशी ज्या चकमकी उडाल्या त्यातून १८० दहशतवादी ठार झाले आहेत. या सगळ्यांचा परिणाम म्हणजे 'काश्मीर=दहशतवाद' हे समीकरण आता हळूहळू संपुष्टात येत आहे. काही महिन्यांपूर्वी जम्मू-काश्मीरमध्ये गुंतवणुकीसंदर्भात उद्योग-वाणिज्य शिखर संमेलन झाले; त्यातून १३,५०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे करार घडून आले हे उल्लेखनीय आहे.

जम्मू-काश्मीर व लडाख यांना जोडणारे जे मोह व झोजी-ला हे दोन बोगदे मार्ग अनुक्रमे जून २०२१ व जून २०२६ पर्यंत पूर्ण होतील, अशी योजना जमिनीवर आकार घेत आहे. यामुळे अतितीव्र हिवाळ्यातही कारगिलशी रस्ता संपर्क टिकून राहू शकेल. याशिवाय कुपवाड्यातील करनाह जलविद्युत प्रकल्प, किश्तवाडमधील किरू वीजप्रकल्प आणि राज्यातील सर्वात मोठ्या अशा पाकल-दुल जलविद्युत प्रकल्पाचे काम अधिक वेगाने सुरू झाले आहे. किश्तवाडमध्ये सर्वात मोठा केशर-पार्क मंजूर झाला असून काश्मिरी सफरचंदे आणि अक्रोडच्या व्यापार विकासासाठीही केंद्र सरकारने नव्या योजना आखल्या





## भारतात दुफळी निर्माण करणाऱ्यांचा पराजय

*'कलम ३७० वर सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय हा भारतात दुफळी निर्माण करणाऱ्यांचा पराजय आणि एकता व अखंडतेच्या प्रसाराच्या राजकारणाचा विजय आहे,' असे वक्तव्य राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य आणि मुस्लिम राष्ट्रीय मंचाचे मुख्य संरक्षक इंद्रेश कुमार यांनी केले. 'मुस्लिम राष्ट्रीय मंचाची नवी दिल्लीमध्ये महत्त्वाची बैठक झाली, ज्यात जम्मू आणि काश्मीरचा विकास आणि त्यांना मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासंदर्भात चर्चा झाली. वर्षानुवर्षे ज्या प्रकारे विनाशाचे राजकारण केले गेले, ते बदलून जम्मू आणि काश्मीरच्या समृद्धी आणि विकासासाठी सर्वांनी पुढाकार घेऊन योगदान दिले पाहिजे, असा निर्णय बैठकीत घेण्यात आला,' अशी माहिती मंचाचे राष्ट्रीय मीडिया प्रभारी शाहिद सईद यांनी दिली. 'फुटीरतावादी, षड्यंत्रकारी, दहशतवादी, हिंसा आणि द्वेषाची भिंत उभी करणारे कलम ३७० कायमस्वरूपी संपुष्टात आले आहे. न्यायालयाने एका महत्त्वाच्या बाबीचा उल्लेख केला आहे. सन १९८० पासून ते आतापर्यंत हजारो लोकांची हत्या झाली आणि लाखो नागरिक विस्थापित झाले. यासाठी चौकशी समिती स्थापन केली जावी, जेणेकरून खऱ्या दोषींचा चेहरा उघड होईल,' असे इंद्रेश कुमार यांनी सांगितले. पाकिस्तानच्या ताब्यातील काश्मीरच नव्हे तर, चीनच्या ताब्यात असलेला काश्मीरचा भूभागही भारतात येणे गरजेचे आहे. आता तो दिवस दूर नाही, ज्याच्यात यश मिळेल. कैलास मानसरोवर चीनपासून मुक्त होणे आवश्यक आहे. लडाख व जम्मू काश्मीरचा जो भूभाग चीनच्या ताब्यात आहे, तोसुद्धा परत मिळवला पाहिजे. तो दिवस दूर नाही, जेव्हा यात यश मिळेल,' असेही इंद्रेश कुमार म्हणाले.*

# काश्मीरमध्ये दगड फेकणारी मुलगी बनली फुटबॉलपटू; पंतप्रधानांनी घेतली दखल



सर्वोच्च न्यायालयानेही हा निर्णय योग्य असल्याचं सांगत कलम ३७० रद्द ठेवण्याचा निर्णय कायम ठेवला आहे. विविध स्तरावरून यानंतर प्रतिक्रिया येत असताना यानिमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विशेष लेख लिहिला आहे. या लेखात त्यांनी कलम ३७० रद्द केल्याने गेल्या चार वर्षांत जम्मू काश्मीरमध्ये काय सकारात्मक चर्चा झाली याबाबत माहिती दिली आहे. शिवाय जम्मू- काश्मीरमधील तरुणांच्या जीवनात कसे अमुलाग्र बदल झाले आहेत हे ही त्यांनी सांगितले आहे. जम्मू आणि काश्मीरच्या लोकांना विकास हवा आहे आणि त्यांना त्यांच्या शक्ती आणि कौशल्याच्या जोरावर भारताच्या विकासात योगदान द्यायचे आहे. त्यांना त्यांच्या मुलांसाठी चांगल्या दर्जाचे जीवन हवे आहे, हिंसा आणि अनिश्चिततेपासून मुक्त जीवन हवे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या लेखात अफशा आशिक या तरुणीचा देखील उल्लेख केला आहे. कधीकाळी ही तरुणी श्रीनगरमधील दगडफेकीत सहभागी होती. परंतु, कलम ३७० रद्द झाल्यानंतर तिला तिच्यातील फुटबॉलचे कौशल्य उमगले. तिला ते जगता आले. तिला त्यानुसार प्रशिक्षण मिळालं आणि आज ती देशातील नामवंत फुटबॉलपटू आहे. याबाबत नरेंद्र मोदी यांनी लिहिले आहे की, क्रीडा क्षेत्रातील तरुणांची क्षमता लक्षात घेऊन आम्ही जम्मू आणि काश्मीरमध्ये विविध उपक्रम राबवले. विविध खेळांच्या माध्यमातून तेथील तरुणांच्या आकांक्षा आणि भविष्यात झालेले बदल आम्ही पाहिले आहेत. या दरम्यान विविध खेळांच्या जागांचे आधुनिकीकरण करण्यात आले आहे. प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात. प्रशिक्षक उपलब्ध करून दिले आहेत. स्थानिक पातळीवर फुटबॉल क्लबची स्थापना करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. या सर्वांचा परिणाम चांगला होतो आहे, असं नरेंद्र मोदी म्हणाले. मला प्रतिभाशाली फुटबॉल खेळाडू अफशा आशिक हिचं नाव आठवतंय. डिसेंबर २०१४ मध्ये ती दगडफेक करणाऱ्या समुहात होती. परंतु, योग्य प्रोत्साहन मिळाल्याने तिने फुटबॉल खेळासाठी प्रयत्न केले. तिला प्रशिक्षणासाठी पाठवण्यात आलं. या खेळात तिने उत्कृष्ट कामगिरी केली. फिट इंडिया डायलॉग्स या कार्यक्रमात तिच्याबरोबर माझी भेट झाली होती. मला आनंद आहे की, आता तरुणांनी किकबॉक्सिंग, कराटे आणि इतर अनेक खेळात आपली प्रतिभा दाखवायला सुरुवात केली आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या लेखातून काश्मीरमधील बदलती परिस्थिती यावर भाष्य केलं आहे. यातून त्यांनी तरुणांच्या आयुष्यात झालेल्या बदलाबाबत त्यांनी भूमिका मांडली आहे. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयाने 'एक भारत, सर्वोत्तम भारत' या भावनेला बळ दिले असल्याचेही ते म्हणाले.

आहेत. गेल्या ७० वर्षांत प्रथमच जम्मू-काश्मीरमध्ये ५० नवी पदवी महाविद्यालये उघडण्यात आली आहेत, ज्यामुळे २५ हजार नव्या जागा प्रवेशासाठी खुल्या झाल्या आहेत.

सरकारी वा खासगी नोकरीनिमित्त वर्षांनुवर्षे जम्मू-काश्मिरात राहिलेल्या लोकांनाही अधिवास (डोमिसाइल) प्रमाणपत्र मिळत नव्हते. ते आता मिळू लागल्याने त्यांचे 'उपरेपण' संपुष्टात आले आहे. केंद्रशासित प्रदेश प्रशासनाने १० हजार पदांवर भरतीची प्रक्रिया तर सुरू केली आहेच, पण बेकारी निर्मूलन व उद्योजकतेला प्रोत्साहन यासाठीही काही नव्या उपाययोजना लागू केल्या आहेत. नवे उद्योग व कारखाने उभे राहावेत यासाठी भूमी-पेठ्या तयार करण्यात आल्या आहेत. भूमी आलेखांचे डिजिटायझेशन आणि ई-स्टँपिंगची सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच महसूल विभागात इतरही प्रशासनिक सुधारणा लागू करण्यात आल्या आहेत.

**मोदी सरकराने जम्मू काश्मीरमध्ये दिलेल्या सोई सुविधा व योजना लाभ**

- काश्मीरमधील प्रत्येक गावात वीज पोहोचली आहे. ३.८० लाख घरांमध्येही वीज पोहोचली आहे.
- आयुष्मान योजनेतून गोरगरिबांना पाच लाख रुपयांपर्यंतचे संपूर्ण मोफत उपचार मिळत आहेत. ७७ लाख लोकांना त्यांच्या उपचारासाठी एक पैसाही खर्च करावा लागू नये, म्हणून त्यांना आरोग्य कार्ड देण्यात आले आहे.
- जम्मू-काश्मीरमध्ये बर्फाळ वाऱ्यातही पक्के घर नसलेले हजारो लोक राहत होते, मोदी सरकारने पंतप्रधान आवास योजनेंतर्गत जम्मू-काश्मीरमध्ये २ लाख लोकांना घरे उपलब्ध करून दिली आहेत.
- मोदी सरकारने सुमारे १२ लाख कुटुंबांना गॅस सिलिंडर उपलब्ध करून दिले आहेत.
- जल जीवन मिशन अंतर्गत ५ लाख घरांमध्ये नळाद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो.
- किसान सन्मान निधी योजनेंतर्गत ११.८७ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात वार्षिक ६ हजार रुपये जमा होत आहेत.
- कलम ३७० मुळे गुज्जर-बकरवाल आणि पहाडी लोकांना शिक्षण, निवडणुका आणि नोकऱ्यांमध्ये आरक्षणाचा लाभ मिळू शकत नव्हता, पण आता हे कलम हटवल्यानंतर या समाजांना आरक्षणाचा लाभ मिळेल.
- भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवण्यासाठी जम्मू-काश्मीरमध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची निर्मिती करण्यात आली आहे, व्हिसलब्लोअर कायदा लागू करण्यात आला आहे.
- उमंगच्या माध्यमातून मोबाइलद्वारे तक्रार नोंदवण्यास सुरुवात करण्यात आली आहे, 'सतर्क नागरिक'मोबाइल ॲप्लिकेशन सुरू करण्यात आले आहे.
- दक्षता कार्यालये उघडण्यात आली आहे.
- इलेक्ट्रॉनिक व्हिजिलन्स क्लिअरन्स प्रणालीही स्थापित करण्यात आली आहे.
- जम्मू-काश्मीर आणि लडाखमध्ये पर्यटन हा रोजगाराचा सर्वात मोठा स्त्रोत आहे. जानेवारी २०२२ पासून सप्टेंबरपर्यंत १.६२ कोटी पर्यटकांनी जम्मू आणि काश्मीरला भेट दिली आहे. पर्यटक संख्येचा हा आजवरचा विक्रम आहे.
- राजौरी, कठुआ, डोळा, अनंतनाग, बारामुल्ला येथे वैद्यकीय महाविद्यालये सुरू करण्यात आली आहेत.
- पंतप्रधान ग्राम सडक योजनेतून जवळपास ४ हजार किलोमीटरचे रस्ते ग्रामीण भागात बांधले जात आहेत.
- जम्मू-पूँछ महामार्ग चौपदरीकरणासाठी १ हजार ३३३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.
- ३७० कलम रद्द झाल्यानंतर गेल्या ३ वर्षात दहशतवादी कारवायांमध्ये मोठी घट झाली आहे.
- ३ वर्षात ७२१ दहशतवादी घटना घडल्या आहेत.
- दलित, आदिवासी आणि सफाई कर्मचाऱ्यांना आरक्षण मिळाले आहे.
- जल विद्युत योजनांद्वारे ६२४ मेगावॅट वीज तयार होणार आहे.
- जम्मू येथे अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था (एआयआयएमएस) आयआयटी, आयआयएम या शैक्षणिक संस्था सुरू झाल्या आहेत.
- मागील ३ वर्षात जम्मू-काश्मीरमध्ये ५६ हजार कोटी रूपये एवढी गुंतवणूक आली आहे. स्वातंत्र्यानंतर ७० वर्षात फक्त १५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आली होती.
- मोदी सरकारच्या पोषण अभियान, मातृवंदन योजनांचा लाभ जम्मू-काश्मीरमधील जनतेला मिळू लागला आहे. ■

# दहशतवाद संपून काश्मीर आता विकास यात्रेत सहभागी

काश्मीरच्या आरक्षण (दुरुस्ती) विधेयकावरील चर्चेला उत्तर देताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी राज्यसभेत केलेल्या भाषणाचा संपादित अंश.

**१९४७** मध्ये देश स्वतंत्र होत असताना काश्मीर राज्याचे विलीनीकरण करून घेताना त्यावेळचे पंतप्रधान पं.जवाहरलाल नेहरू यांनी केलेल्या घोडचुकांची किंमत काश्मीरलाच नव्हे तर संपूर्ण देशाला भोगावी लागली. देश स्वतंत्र होत असताना ५५० संस्थानांचे भारतात यशस्वी विलीनीकरण झाले. यापैकी एकाही राज्यात ३७० वे कलम लागू करण्यात आले नव्हते. फक्त काश्मीरसाठी हे कलम लागू करण्यात आले. काश्मीर संस्थानाचे विलीनीकरण करून घेताना दाखविल्या गेलेल्या ढिलाईमुळे पाकिस्तानला काश्मीरवर आक्रमण करण्याची संधी मिळाली. पाकिस्तानच्या घुसखोरीनंतर सरकार जागे झाले. काश्मीरला स्वतंत्र दर्जा देणारे कलम रद्द करून मोदी सरकारने नेहरूंनी केलेल्या चुकीची दुरुस्ती केली. २०१४ मध्ये सत्तेत आल्यानंतर मोदी सरकारने जम्मू-काश्मीरमधील दहशतवाद संपुष्टात आणण्यासाठी आणि या राज्याच्या विकासाला गती देण्यासाठी अनेक निर्णय घेतले. ३७० वे कलम रद्द झाल्यानंतर जम्मू-काश्मीरच्या विकास प्रक्रियेला आणखी गती मिळाली. दहशतवाद्यांच्या नाड्या आवळल्यामुळे काश्मीर खोऱ्यातील परिस्थिती निवळली आहे. दगडफेकीच्या घटना पूर्णपणे थांबल्या आहेत. सामान्य माणूस मोकळेपणाने वावरू लागला आहे. त्यामुळेच यावर्षी काश्मीरला २ कोटी पर्यटकांनी भेट दिली.

१९८९ ते २०१४ या काळात काश्मीर खोऱ्यात झालेल्या हिंसाचारात ४० हजारांहून अधिक लोक ठार झालेत. याला जबाबदार कोण, हा प्रश्न विरोधकांनी




मोदी सरकारने व्यवसाय व्यवस्थापन संस्था (आयआयएम) चालू केल्यामुळे काश्मीरमधील युवकांना उच्च शिक्षणाची संधी मिळाली आहे.

स्वत:लाच विचारावा. मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर विकासाबाबत मागास राहिलेल्या या राज्यासाठी अनेक निर्णय घेण्यात आले. त्यामुळे एकेकाळी सुरक्षा दलाच्या जवानांवर दगडफेक करणाऱ्या तरुणांच्या हातात आता लॅपटॉप दिसू लागले आहेत. काश्मीरची जनता आता लोकशाही आणि विकासाच्या मुद्यावर बोलू लागली आहे. तेथील जनतेच्या मनात असलेली अलगवादाची भावना ३७० कलम रद्द केल्यानंतर कमी होईल, असे मी म्हटलं होते. त्याप्रमाणे काश्मीरमधला सामान्य माणूस दहशतवाद आणि काश्मीरचे तथाकथित स्वातंत्र्य या गोष्टी विसरत चालला आहे. पर्यटकांची संख्या वाढल्यामुळे काश्मीर खोऱ्यातील रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात वाढू लागल्या आहेत. काश्मीरच्या जनतेला आता शांतता आणि विकास हवा आहे. शाळा, महाविद्यालये सुरू झाल्यामुळे उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रगतीची संधी उपलब्ध झाली आहे. काश्मीर खोऱ्यातील सामान्य माणूस दहशवाद्याच्या भीतीपोटी घरातून बाहेर पडू शकत नव्हता. आता सार्वजनिक ठिकाणी सामान्य माणूस मोकळेपणाने वावरू लागला आहे. काश्मीर खोऱ्यातील चित्रपटगृहे सुरू झाली आहेत. विकासाची फळे मिळू लागल्याने काश्मीरची जनता समाधानी झाली आहे. भारताविरुद्ध चिथावणीखोर वक्तव्ये करून सामान्य माणसांच्या मनात विद्वेषाची भावना निर्माण करणाऱ्या विभाजनवादी शक्तींचा प्रभाव संपत

# ७५ वर्षांनंतर कुपवाडामध्ये शारदा मंदिरात पूजा



*यंदा नवरात्रौत्सवाच्या दुसऱ्या दिवशी १६ ऑक्टोबर रोजी नियंत्रण रेषेवरील टीटवाल येथील नवनिर्मित शारदा मंदिरामध्ये शरद नवरात्रौत्सवाचं आयोजन करण्यात आलं. या नवरात्रौत्सवामध्ये देशभरातील अनेक भाविकांनी सहभाग घेतला होता. १९४७ मध्ये देशाची फाळणी झाल्यानंतर गेल्या ७५ वर्षांत प्रथमच इथे नवरात्रौत्सवाचं आयोजन करण्यात आलं होतं. हंपी येथील स्वामी गोविंदानंद सरस्वती हे त्यांच्या काही अनुयायांसह कर्नाटकमधील किष्किंधा येथून रथयात्रा करत इथे पोहोचले. तसेच काही काश्मिरी पंडित तीर्थयात्रीही इथे उपस्थित होते. देशाच्या फाळणीनंतर नियंत्रण रेषेवर असलेल्या शारदा मंदिरामध्ये नवरात्रौत्सवाची पूजा करणं पुन्हा एकदा ऐतिहासिक क्षण होता. येथे मंदिर आणि गुरुद्वारा होता. ते १९४७ मध्ये हल्ला करणाऱ्या घुसखोरांनी जाळून टाकलं होतं. आता त्याच जमिनीवर एक नवं मंदिर आणि गुरुद्वारा बांधण्यात आला आहे. त्याचं उद्घाटन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी यंदा २३ मार्च रोजी केलं होतं. स्वातंत्र्यानंतर जम्मू-काश्मीरमधील हिंदू कायमच असुरक्षित वातावरणात वावरत होते. १९८९ नंतर हिंदुंच्या असुरक्षिततेमध्ये वाढ झाली. मोदी सरकारने ही असुरक्षितता दूर केली.*



दहशतवादामुळे बंद पडलेल्या काश्मीरमधील शाळा पुन्हा सुरू झाल्या आहेत. शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये मुली उत्साहाने भाग घेत आहेत.

चालला आहे. २००४ ते २०१४ या काळात सुरक्षादलाचे २८२९ जवान दहशतवाद्यांच्या हल्ल्यात ठार झाले. २०१९ ते २०२३ या चार वर्षात म्हणजे ३७० वे कलम रद्द केल्यानंतरच्या काळात दहशतवाद्यांच्या हिंसक घटनांत ७० टक्के घट झाली आहे. २०१० मध्ये दगडफेकीच्या घटनांमध्ये २६५४ सामान्य नागरिकांना जीव गमवावा लागला होता. २०१० मध्ये दगडफेकीच्या घटनांमध्ये ६२३५ नागरिक जखमी झाले होते.

२०२३ मध्ये दगडफेकीची एकही घटना घडली नाही. दगडफेक करावयास लावणाऱ्या देशविरोधी शक्तींचा बंदोबस्त केल्यामुळे काश्मीरचा सामान्य माणूस शांतता अनुभवतो आहे. दहशतवादामुळे काश्मीर खोऱ्यातील रोजगाराच्या संधी बंद झाल्या होत्या. विद्यार्थी आणि युवकांना भारताविरूद्ध धर्माचा आधार घेत चिथावले जात होते. मोदी सरकारने अशा शक्तींचा बिमोड केला आणि काश्मीरमध्ये शांतता प्रस्थापित केली, हे मी अभिमानाने सांगू इच्छितो. ज्या कुटुंबातील सदस्य दगडफेकीमध्ये भाग घेताना आढळला तर त्या कुटुंबातील तरुणांना सरकारी नोकरी दिली जाणार नाही, असा कठोर निर्णय आम्ही घेतल्यामुळे तेथील युवक विभाजनवादी शक्तींपासून दूर होऊ लागला आहे. डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी काश्मीर भारतातच राहिले पाहिजे, यासाठी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. डॉ.मुखर्जी यांचे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रत्यक्षात आणले आहे. जम्मू-काश्मीरमधील अनुसूचित जातीसाठी विधानसभेत आरक्षण ठेवण्याचा निर्णय मोदी सरकारने घेतला. काश्मीरमध्ये तीन कुटुंबांनी आपले साम्राज्य निर्माण केले होते. या कुटुंबाची सत्ता संपुष्टात आल्यामुळे सामान्य माणसाच्या हिताचे अनेक निर्णय गेल्या चार वर्षात घेण्यात आले आहेत. ■

# 'मेक इन इंडिया' धोरणाचा पुरस्कार

● मिलिंद कानडे

> भारताचे जागतिक पातळीवर वाढते सामर्थ्य अधोरेखित करणाऱ्या जी-२० या शिखर संमेलनाला इंग्लंड, इटली, जपान, जर्मनी, फ्रान्स आदी राष्ट्रांच्या प्रमुखांची उपस्थिती ऐतिहासिक ठरली. या संमेलनाच्या काही दिवस आधी भारताने पूर्णत: स्वदेशी बनावटीच्या चांद्रयान-३ ची चंद्रसफर जागतिक पातळीवर चर्चेचा विषय ठरली. आदित्य- एल१ ची सूर्यापर्यंतची भरारी, जागतिक बाजारपेठेत ३ ट्रिलियनच्या रांगेत स्वत:ला स्थापित करत भारताने जागतिक अर्थव्यवस्थेच्या यादीत पाचव्या स्थानावर उडी मारली आहे.

**एकीकडे** देश स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करीत असताना घडत असलेल्या या सकारात्मक घडामोडी बघता देशासाठी हा काळ खऱ्या अर्थाने 'अमृतकाळ' ठरला आहे. 'भारत हा जगातील महासत्ता होईल', असे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाहिले होते. या स्वप्नापर्यंत पोहोचवण्याची वाट निश्चितपणे बिकट होती. पण मागील नऊ वर्षात मोदी सरकारने राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर जे काही धोरणात्मक निर्णय घेतले आणि त्यांची अतिशय नियोजनबद्ध अंमलबजावणी केली, त्याचेच हे फलित आहे. अवकाश, संशोधन, व्यापार, वस्तू, सेवा, निर्यात आदी क्षेत्रात वेगाने सुरू असलेली घोडदौड बघता २०३० पर्यंत भारताची अर्थव्यवस्था जगात तिसऱ्या स्थानावर राहील, असे अंदाज जगभरातील सर्वेक्षण संस्था बांधू लागल्या आहेत.




**अर्थव्यवस्थेचे मजबुतीकरण**

एखाद्या देशाची अर्थव्यवस्था जेव्हा आकाराने मोठी आणि मजबूत व्हायला लागते, तेव्हा त्यामध्ये वस्तू आणि सेवा क्षेत्राचे फार मोठे योगदान असते. पण केवळ वस्तूंचा व्यापार केल्याने अर्थव्यवस्था मोठी होते का? तर नाही. जागतिक स्तरावर आपल्या वस्तूंचा दर्जा टिकवून ठेवायचा असेल तर उत्पादनांचे मूल्यवर्धन होणेही तितकेच महत्वाचे असते. दर्जेदार उत्पादनांची निर्मिती वाढवायची असेल तर या उत्पादनांच्या खरेदीसाठी नागरिकांची क्रयशक्ती वाढवण्याची आवश्यक असते. पण ही क्रयशक्ती अशीच वाढत नाही त्यासाठी सरकारी खर्चात वाढ करावी लागते; रस्ते, रेल्वे, शिक्षण, आरोग्य, टेलिकॉम सारख्या पायाभूत सुविधांमध्ये सढळ हस्ते गुंतवणूक करावी लागते. त्यातून मग मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होते. रोजगार मिळाल्यामुळे नागरिकां जवळ पैसा खेळता राहतो आणि क्रयशक्ती वाढते. पर्यायाने उत्पादनांची मागणी वाढते. मागणी वाढली की पुरवठा वाढतो, बचत वाढते, गुंतवणूकही वाढते आणि मग उत्पादन क्षमताही वाढते. हे वृद्धीचे चक्र जसजसे आकाराने मोठे होत जाते तसतसा अर्थव्यवस्थेची आकारही मोठा होत जातो. विद्यमान सरकारने याचा बारकाईने अभ्यास केला आणि 'महासत्ता' होण्यासाठी 'मेक इन इंडिया'च्या संकल्पनेला बळ दिले.

**'मेक इन इंडिया' चे चार स्तंभ**

२०१४ साली मोदी सरकारने 'मेक इन इंडिया' म्हणजे 'भारतात निर्माण' या मोहिमेला प्रारंभ केला होता. औद्योगिक उत्पादनात वाढ करून देशात आर्थिक समृद्धी आणण्याची कल्पना त्यामागे होती. नवाचार, नवक्षेत्र,



नवसुविधा आणि नवप्रक्रिया या चार स्तंभावर आधारित असलेल्या 'मेक इन इंडिया'चे हे अभियान बहुआयामी होते. यात वस्तू निर्माण क्षेत्रच नाही तर इतर सर्व क्षेत्रांना प्रोत्साहन देण्यासाठी धोरण आखण्यात आले. निर्माण क्षेत्रात १२ ते १४ टक्के पर्यंत दरवर्षी वृद्धी व्हावी, मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती व्हावी, जीडीपी २५ टक्केपर्यंत वाढावा, ग्रामीण भागात कौशल्य विकास व्हावा आणि नोकरीसाठी स्थलांतर करणाऱ्यांची संख्या कमी व्हाव, शाश्वत पर्यावरणाला प्रोत्साहन मिळावे आणि जागतिक स्तरावरील स्पर्धेत भारताचे स्थान मजबूत व्हावे, अशा अनेक उद्देशांनी प्रेरित असलेले हे अभियान आहे.

**धोरणाची आक्रमक अंमलबजावणी**

२०२० साली कोविड-१९ विषाणूने जगभरात धुमाकूळ घातला. महामारीचा हा काळ भारतासाठी सर्वाधिक आव्हानात्मक ठरला. देशासमोर मोठे संकट उभे राहिले. आयात-निर्यातीवर मर्यादा आल्या, आंतरराष्ट्रीय



व्यापार ठप्प झाला. पाठोपाठ युक्रेन-रशियामध्ये युद्ध सुरू झाले. महागाईचा भस्मासूर आणखी अक्राळ-विक्राळ झाला. अशा विपरीत परिस्थितीत भारतीय अर्थव्यवस्थेला टिकवून ठेवण्यासाठी 'मेक इन इंडिया' अभियान आक्रम कपणे राबवण्याची निकड निर्माण झाली. चीनसारख्या कुटील, कपटी देशावरचे अवलंबित्व करण्यासाठी हाच एक उत्तम पर्याय देशासमोर होता. अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेला कोरोनाने पोखरून टाकले असताना केवळ भारताने 'मेक इन इंडिया' हे अभियान जोरकसपणे राबवत 'संकटातून सुवर्णसंधी' साधली. कोरोना काळात पीपीई किट, मास्क, विविध प्रकारच्या औषधी आणि लस केवळ तयारच केली नाही तर जगातील अनेक देशांना त्यांची निर्यात केली. शेती उत्पादन, संरक्षण, विविध प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक उत्पादनांना 'मेक इन इंडिया'चा टॅग लागला.

**उद्योगवाढीसाठी विविध योजना**

भारत सरकारने या काळात उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजना राबवल्या. व्यावसायिक क्षेत्राचा विकास साधण्याच्या दृष्टीने व्यावसायिक वातावरण निर्मिती, नियम व प्रक्रियांचे सुलभीकरण, परवाने व नियामक प्राधिकरणांचा हस्तक्षेप कमी करणे, त्यातही देशभरात औद्योगिक महामार्गाची निर्मिती करणे, देशातील विविध क्षेत्रात आवश्यक असलेल्या उद्योगांसाठी क्लस्टर पद्धतीने नियोजन करणे, देशभरात स्मार्ट सिटींची उभारणी करणे, औद्योगिक क्षेत्रात आविष्कारांना प्रोत्साहन देणे,



कौशल्य विकसित करणे, धोरणांमध्ये कुठेही त्रुटी राहू नये व त्याचा विपरीत परिणाम होऊ नये याकडे लक्ष देणे, थेट विदेशी गुंतवणुकीसाठी उदारीकरणाचा मार्ग स्वीकारला आणि त्यातही संरक्षण, बांधकाम, औषध निर्मिती, नागरी उड्डयण आणि रेल्वे या क्षेत्रात खाजगी गुंतवणुकीला वाव देणे आदी योजनांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यात आली.

**'मेक इन इंडिया'ची फलश्रुती**

ऑटोमोबाईल क्षेत्रात सूक्ष्म अर्थव्यवस्थेला प्रोत्साहन देण्याचे सामर्थ्य असल्याने या क्षेत्रात मशीन टूल पार्कची उभारणी करण्यात आली. संरक्षण क्षेत्र गुंतवणुकीसाठी खुले करण्यात आले आणि त्यातून 'बीआरओ'ने लद्दाखसारख्या भागात विक्रमी रस्ते निर्मिती केली. 'डीआरडीओ'ने आयएनएस विक्रांतसारखी स्वदेशी बनावटीची विमानवाहू नौका तयार केली. शस्त्रनिर्मिती आणि हेलिकॉप्टर निर्मिती व निर्यात वाढली आहे. इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात कॉम्प्युटर, संबंधित सर्व उपकरणे आणि त्यातील चीप डिझायनिंग या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली. औषधनिर्मिती क्षेत्रात तर जनऔषधी सुगम ॲप वापरणाऱ्यांची संख्या वाढली. औषधी, गोळ्या, कॅप्सूल आणि लस निर्मितीच्या क्षेत्रात भारत आत्मनिर्भर झाला.

देशाला आत्मनिर्भर करणाऱ्या या योजनेचे सकारात्मक परिणात लगेच दृष्टीपथात येऊ लागले. जगभरातील अनेक इलेक्ट्रॉनिक्स कंपन्यांनी भारतात गुंतवणूक करण्याची इच्छा दर्शवली. आतापर्यंत विविध देशातून आयात होणारे स्मार्टफोन भारतात तयार होऊ लागले. आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त चारचाकी वाहनांमध्ये आवश्यक असलेले सेमीकंडक्टर आणि चीपचा तुटवडा भासत असल्यामुळे वाहनांच्या डिलीव्हरीसाठी वर्षभराची वेटींग लिस्ट होती. 'आयटी'साठी आवश्यक असलेले सेमीकंडक्टर, चीप इत्यादी हार्डवेअर देशातच तयार करण्याचा निर्धार करण्यात आला. तिकडे संरक्षण क्षेत्रालाही आत्मनिर्भर करण्याची प्रक्रिया सुरू झाली. संरक्षण व्यवस्थेसाठी लागणारी उत्पादने देशातच तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे स्मार्टफोन, मल्टीरोल हेलिकॉप्टरसारखी उत्पादने भारतीय कंपन्यांनी निर्माण करण्याच्या प्रक्रियेला वेग आला आहे. आयआयटी मद्रासच्या नेतृत्वाखाली देशात प्रथमच ५ जी नेटवर्क विकसीत केले.

ॲपल, सॅमसंग, एलजी, सोनी सारख्या इलेक्ट्रॉनिक क्षेत्रातील जगातल्या मोठ्या कंपन्यांनी भारतात उद्योग स्थापन केले. या कंपन्यांच्या उत्पादनांवर 'मेड इन इंडिया' चे टॅग झळकू लागला. या कंपन्यांची उत्पादनाने भारतातून निर्यात होऊ लागली. वाहतूक क्षेत्रातील मर्सिडिज, टोयोटा, किया, ह्युदाई सारख्या कंपन्यांनी भारतात उत्पादन सुरू केले. या कंपन्यांच्या उत्पादनांना लागणाऱ्या सहायक उपकरणांच्या लघुउद्योगांची साखळी देशात तयार करण्यात आली. जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारताची अर्थव्यवस्था 'मेक इन इंडिया'मुळे मजबूत होण्याच्या दिशेने वेगाने मार्गक्रमण करू लागली.

**भविष्यातील दिशा**

पुढच्या काळात देशाची अर्थव्यवस्था पहिल्या स्थानावर नेण्यासाठी निकराने प्रयत्न करण्याची गरज आहे. चीनवरची उद्योग क्षेत्राची भिस्त कमी करण्यासाठी विशेषत्वाने प्रयत्न केले जात आहेत. इलेक्ट्रिक वाहनांसाठी आवश्यक असलेल्या सेमीकंडक्टर चीप निर्मितीसाठी जोरकसपणे प्रयत्न सुरू आहेत. देशात इलेक्ट्रीक वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यातून होणारे कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी प्राधान्याने बॅटरी युनिटचे भारतात उत्पादन व्हावे यासाठी पायाभूत सुविधा तयार केल्या जात आहेत. हायड्रोजन फ्युअल सेल तंत्रज्ञानावर आधारित कार आदी वाहनांच्या निर्मितीसाठी प्रयास सुरू असून आर्टिफिशल इंटेलिजेन्स, मशिन लर्निंग, डेटा ॲनॅलिसीससाठी प्रयत्न होताना दिसत आहे. त्यामुळे 'मेक इन इंडिया' हा स्वयंपूर्ण, आत्मनिर्भर राष्ट्र उभारणीचा महामार्ग ठरणार असून देशाने जागतिक महासत्ता होण्याचे पाहिलेले स्वप्न पूर्ण होण्यासाठी अजून किती काळ लागतो, याकडे प्रत्येक भारतीयाचे लक्ष लागलेले आहे.

**(लेखक हे व्यवसायाने सनदी लेखापाल असून प्रदेश प्रवक्ता आणि आर्थिक प्रकोष्ठचे प्रदेश संयोजक आहेत.)**

# पराभूत मानसिकतेतील अगतिक विरोधक



> मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड या तीन राज्यांतील पराभव काँग्रेससह अनेक विरोधी पक्षांच्या चांगलाच जिव्हारी लागला आहे. राजस्थान, छत्तीसगड ही दोन्ही राज्ये आपल्याच ताब्यात राहणार शिवाय मध्य प्रदेशही आपण भाजपाकडून खेचून घेणार याची काँग्रेसच्या माय-लेकरू नेतृत्वाला प्रचंड खात्री होती.

**कर्नाटक** विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात केलेली आश्वासनांची खैरात बहुमताच्या रूपाने कामी आली असल्याने त्याच पद्धतीची आश्वासने या तिन्ही राज्यांच्या मतदारांना काँग्रेस नेतृत्वाने दिली होती. या खैरातीचा प्रसाद मोठ्या विजयाच्या रूपाने पदरात पडणार या विश्वासाने काँग्रेस आणि घमंडीया आघाडीतील अन्य सरदार निकालाआधीच गुलाल उधळू लागले होते. ज्यांचा या निवडणुकीशी दूरदूर संबंधही नव्हता असे 'शिउबाठा'चे प्रमुख उद्धव ठाकरे, त्यांचे पुत्र आदित्य आणि या पितापुत्रांची स्वयंघोषित 'झीरो शॅडो' संजय राऊत हे मातोश्रींचे,' टॉम, डिक अँड हॅरी' काँग्रेस जिंकणार याच्या आत्मविश्वासात गाजर हलवा तयार करण्याच्या तयारीत गुंतले होते. ही तिन्ही राज्ये जिंकली की २४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाचा पाडाव नक्की या स्वप्नाचा चक्काचूर झाल्याचा जबरदस्त मानसिक धक्का माय लेकरू नेतृत्वाला बसला. 'भैय्या बेईमान' ही ठुमरी आर्ततेने सादर करणाऱ्या बारामती कन्येलाही या पराभवाचे दुःख आपल्या 'सुळ्यां' चा वापर करून पचवता आले नाही. असो. ममता, लालू, केजरीवाल ही मंडळीही भाजपाच्या विजयाने धास्तावले. आता आपापल्या प्रांतातल्या सुभेदाऱ्याही गमवाव्या लागणार आणि त्यापुढे हरिनाम सप्ताह साजरा करावा लागणार या चिंतेने या मंडळींनाही ग्रासले. मतदारांनी आपल्यावरून हटवलेला प्रकाशझोत पुन्हा आपल्यावर येण्यासाठी या मंडळींना संसदेतील तरुणांच्या घुसखोरीचे निमित्त मिळाले. संसदेत या घुसखोरीप्रश्नी पंतप्रधानांनी निवेदन करावे अशी मागणी करीत या मंडळींनी दोन्ही सभागृहात सर्व संकेत धुडकावत गोंधळ घातला. परिणामी या खासदारांना लोकसभा सभापतींना आणि राज्यसभेच्या अध्यक्षांना निलंबित करावे लागले.

संसद अधिवेशन सुरु होण्याआधी कामकाज सुरळीत चालावे यासाठी सभागृहात फलक आणू नयेत, असे सर्वानुमते ठरले होते. तरुणांच्या घुसखोरी प्रकरणी पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्र्यांनी निवेदन करावे ही मागणी सरकारने फेटाळलीही नव्हती. तरीही प्रसिद्धीचा झोत आपल्यावर पाडून घेऊन त्या द्वारे मतदारांची सहानुभूती मिळवण्याचा अगतिक प्रयत्न विरोधकांनी केला. संसदेच्या आवारात घोषणाबाजी करताना उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या नकला करताना त्यांच्या शारीरिक व्यंगाचा आधार घेण्यापर्यंत विरोधकांची पातळी घसरली. या नकला कृत्याचे चित्रीकरण करून काँग्रेसच्या युवराजांनी त्याचा आनंदही घेतला. एवढेच नव्हे तर त्याही पुढे जाऊन विरोधकांनी तरुणांच्या घुसखोरीला समर्थनही दिले. या तरुणांनी संसदेत सुरक्षा व्यवस्था उल्लंघून टाकण्यासाठी केलेल्या हालचाली राष्ट्रविरोधी शक्तींच्या हातातले बाहुले बनूनच केल्या होत्या असं मानण्यास जागा आहे. या तरुणांची पार्श्वभूमी, त्यांचे अलीकडील राजकीय लागेबांधे पाहता संसदेत केलेली घुसखोरी हा भारताची प्रतिमा मलिन करण्यासाठी केलेला सुनियोजीत कट होता, हे हळूहळू उघड होऊ लागले आहे.

अशा संवेदनशील प्रकरणाच्या तपासाची माहिती संसदेत देताना सरकारवर अनेक बंधने येत असतात. केंद्र सरकारने सखोल तपास करून यामागच्या शक्तींचा छडा लावावा, अशी राष्ट्रहित सर्वतोपरी ठेवणारी भूमिका विरोधकांनी घेणे अपेक्षित होते. मात्र तीन राज्यातील पराभवाने निराशेच्या गर्तेत लोटल्या गेलेल्या काँग्रेसच्या मायलेकरू नेतृत्वाला तेवढी परिपक्वता दाखवता आली नाही. पराभवाने आलेले वैफल्य मायलेकरू नेतृत्वाला संसदेत अशोभनीय दंगा घालण्यास प्रवृत्त करून गेले.

भारतीय जनता पार्टी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाला विरोध करणे हा काँग्रेस सह सर्व विरोधी पक्षांचा हक्कच आहे. हा हक्क बजावत असताना पक्षीय भूमिकेने देशहिताची भूमिका ओलांडू नये, ही प्राथमिक अपेक्षा आहे. माय–लेकरू नेतृत्वाने सर्व राजकीय सभ्यता, संकेत धुडकावत मोदी विरोधाची भूमिका राष्ट्राच्या विरोधापर्यंत नेण्यात धन्यता मानली आहे. २०२० मध्ये संपूर्ण जग कोरोनारुपी महासंकटाशी लढा देत असताना चीनने पूर्व लडाखच्या गलवान, पँगॉन्ग त्सो खोऱ्यात घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला होता. त्या घुसखोरीला

> ***सलग १० वर्षे केंद्रातील सत्तेतून बाहेर राहण्याची वेळ काँग्रेसवर प्रथमच आली आहे. नरेंद्र मोदी यांना पर्याय म्हणून राहुल गांधी यांचा चेहरा पुढे करणे पक्षाला परवडत नसल्याचे २०१४ आणि २०१९ अशा दोन्ही निवडणुकीत दिसले आहे. देशातील सध्याचे जनमताचे वारे लक्षात घेता काँग्रेस नेतृत्वाला २०२४ च्या निवडणुकीतही आपला निभाव लागणार नसल्याची खात्री पटली आहे. त्यामुळे येनकेन मार्गाने मोदी सरकार आणि भारतीय जनता पार्टीला अडचणीत आणण्याच्या हालचाली सुरू आहेत. त्यासाठी देशविरोधी शक्तींशी हातमिळवणी करण्याचीही विरोधकांची तयारी आहे.***

भारतीय जवानांनी कडवा प्रतिकार करत चीनच्या सैन्याचा घुसखोरीचा डाव उधळून लावला. त्या संघर्षात भारताचे २० जवान हुतात्मा झाले. त्यावेळी झालेल्या घटनेची माहिती देण्यासाठी मोदी सरकारने सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन केले होते. त्या बैठकीत संपूर्ण देश चीनच्या विरोधात केंद्र सरकार मागे उभा आहे, असे दर्शविण्याऐवजी सोनिया गांधी यांनी सीमेवर जैसे थे परिस्थिती राहील असं आश्वासन द्या, असा विसंवादी सूर लावत आपला टोकाचा भाजपा विरोध कायम ठेवला. मायावती, शरद पवार, मुलायमसिंग यादव या विरोधी नेत्यांनी सरकार जे काही करेल त्याला आमचा पाठिंबा आहे, असं म्हणत देशहिताला प्राधान्य दिले. संसदेत घुसखोरी करण्यामागे देशाला आणि पर्यायाने मोदी सरकारला बदनाम करण्याचं कारस्थान असेल तर ते कोणी शिजवलं याचे धागेदोरे शोधणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर सशक्त, बलशाली, आत्मनिर्भर भारताचा डंका वाजू लागला असताना काही अस्तनीतले साप भारताच्या प्रगतीत अडथळे आणण्याचे प्रयत्न करीत आहेत. हे प्रयत्न उधळून लावण्यासाठी सरकारला सहकार्य करून संयम बाळगण्याऐवजी संसदेत दंगा करणं हा 'सुलभ' मार्ग पत्करून या मंडळींनी आपल्या नैराश्याचे उत्सर्जन करण्याचा प्रयत्न केला. याच मानसिकतेतून २०१६ मध्ये सैन्याच्या सर्जिकल स्ट्राईक वरही शंका उपस्थित केली गेली. ही मानसिकता भारतीय जनतेला रुचत नाही, हे ठाऊक असूनसुद्धा ही मंडळी आपणच निर्माण केलेल्या जाळ्यात पुन्हा पुन्हा अडकतात. ■

# महाराष्ट्रातील सौरक्रांती

● विश्वास पाठक

> सौर ऊर्जेचा वापर करून वीज निर्मिती करण्याच्या कामात सर्वात मोठा अडथळा जमिनीच्या उपलब्धतेचा असतो. या वीज निर्मितीसाठी प्रती मेगावॅट सुमारे साडेचार कोटी रुपये गुंतवणूक करावी लागते, परंतु विजेची हमखास विक्री होऊन पैसे मिळणार असल्याने गुंतवणुकीसाठी निधी उभारणे फार अवघड नसते. तंत्रज्ञानाच्या बाबतीतही फारसे आव्हान नाही. सौर ऊर्जा निर्मितीसाठीच्या सोलर पॅनेल्सच्या किमती सातत्याने कमी होत आहेत व त्यांच्या उपलब्धतेची समस्या नाही.

**मोदी** सरकारच्या प्रयत्नांमुळे आता देशातच मोठ्या प्रमाणात सोलर पॅनेल उत्पादनाला चालना मिळाली आहे. पण सौर ऊर्जा निर्मितीसाठी प्रती मेगावॅट चार एकर जागा आवश्यक असते. हजारो मेगावॅट वीजनिर्मिती करायची असेल तर त्यानुसार स्वाभाविकपणे इतक्या मोठ्या प्रमाणात जमीन उपलब्ध होणे अवघड होते. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेच्या अंमलबजावणीसाठी जमिनीच्या उपलब्धतेचा अडथळा दूर करण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी सरकारी मालकीच्या जमिनी शेतकऱ्यांसाठीच्या वीजनिर्मितीसाठी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला. अशा जमिनी शोधून उपलब्ध करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समित्या नेमल्या. त्यानंतर या योजनेला पुन्हा गती आली. यामुळे एरवी पडीक असलेल्या सार्वजनिक जमिनी शेतकऱ्यांच्या हितासाठी वापरल्या जाण्याचा मार्ग मोकळा झाला आणि सौर ऊर्जा निर्मितीमधील मोठा अडथळा दूर झाला. तसेच




उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री म्हणून मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेला चालना देताना मा. देवेंद्र फडणवीस यांनी मिशन २०२५ निश्चित केले. प्रत्येक जिल्ह्यात किमान ३० टक्के कृषी फीडर सौर उर्जेवर चालविण्याचे उद्दीष्ट त्यांनी ठरविले. वरील पार्श्वभूमीवर मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली राज्याच्या मंत्रिमंडळाने १९ एप्रिल २०२३ रोजी शेतकऱ्यांसाठी ७,००० मेगावॅट वीजनिर्मिती करण्याचे उद्दीष्ट गाठण्यासाठी 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना– २.०' राबविण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला. त्याची सुरुवात २४ एप्रिल २०२३ रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाली.

**मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना – २.०**

मा. देवेंद्र फडणवीस यांनी जून २०१७ मध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना सुरू केली होती. त्याची अंमलबजावणीही सुरू होती. त्यातील अनुभव आणि अडचणी ध्यानात घेऊन राज्य सरकारने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना–२.० हे नवे अभियान सुरू केले. या अभियानाचे अनेक लाभ होतील. राज्यातील किमान ३० टक्के कृषी फीडर सौर उर्जेवर चालविण्याचे उद्दीष्ट आहे. एवढ्या फीडर्सना शेतीसाठी खास निर्माण केलेली वीज मिळणार असल्याने राज्यात खूप मोठ्या संख्येने शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा आणि भरवशाचा वीज पुरवठा होईल. दररोज दिवसा आठ तास वीज पुरवठ्याचे उद्दीष्ट निश्चित केले आहे. या योजनेत सौर उर्जा निर्मिती करणाऱ्या विकसकांकडून अंदाजे ३ रुपये ३० पैसे प्रति

युनिट दराने वीज मिळणार आहे. सध्या शेतकऱ्यांना साडे आठ रुपये प्रती युनिट दराची वीज दीड रुपये प्रती युनिट दराने पुरविली जाते. त्या ऐवजी सुमारे तीन रुपये ३० पैसे प्रती युनिट दराने मिळणारी वीज दीड रुपये दराने पुरविली तरी मोठ्या प्रमाणात खर्च कमी होईल. यामध्ये पुरवठादार कंपन्यांकडून स्पर्धात्मक बोली लागणार असल्याने त्यांच्याकडून कदाचित तीन रुपयांपेक्षाही कमी दराने वीज मिळू शकते. परिणामी शेतकऱ्यांना सवलतीने वीज पुरवठा करताना येणारा क्रॉस सबसिडीचा बोजा मोठ्या प्रमाणात कमी होईल व भविष्यात उद्योगांच्या वीजदरात कपात करण्याची संधी मिळेल. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.० या अभियानात शेतीला दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी ७,००० मेगावॅट वीजनिर्मितीचे उद्दीष्ट ठेवले आहे. त्यासाठी सुमारे ३०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक होणे अपेक्षित आहे. ही सर्व गुंतवणूक खासगी उद्योजकांकडून होईल. ही गुंतवणूक राज्याच्या ग्रामीण भागात होणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागात सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारून चालविण्यासाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची गरज भासेल. या अभियानामुळे सुमारे १९,००० रोजगार निर्माण होतील, असे अपेक्षित आहे. या अभियानातील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पासांठी प्रती मेगावॅट चार एकर याप्रमाणे २८,००० एकर जमिनीची गरज आहे. वीज उपकेंद्रापासून पाच किलोमीटर अंतरापर्यंतची शेतकऱ्यांची जमीनही भाड्याने घेता येते. शेतकरी ३० वर्षांसाठी जमीन भाड्याने देऊ शकतात. त्यांना जमिनीसाठी दरवर्षी प्रति हेक्टर सव्वा लाख रुपये भाडे मिळेल. हे भाडे दरवर्षी तीन टक्क्यांनी वाढत जाईल.

**अर्थपूर्ण धोरणामुळे चालना**

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना- २.० साठी राज्य सरकारने निश्चित केलेले धोरण शासन निर्णयाच्या स्वरुपात ८ मे २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आले आहे. ते सर्वांना पाहण्यासाठी उपलब्ध आहे. यामध्ये राज्यात २०२५ पर्यंत सौरऊर्जेद्वारे किमान ३० टक्के कृषी वीज वाहिन्यांना दिवसा वीज पुरवठा उपलब्ध करणे, हे उद्दीष्ट आहे. अभियानासाठी नोडल एजन्सी म्हणून महाराष्ट्र राज्य वीज मंडळ सूत्रधारी कंपनीच्या अंतर्गत एक स्वतंत्र कृषी कंपनी स्थापन केलेली आहे. सध्या अभियानाच्या अंमलबजावणीत महावितरणचा प्रमुख सहभाग आहे.

जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवडण्यात आलेली शासकीय, निमशासकीय जमीन, महावितरण अथवा महापारेषण अथवा महानिर्मितीकडे उपलब्ध अतिरिक्त जमीन, खासगी जमीन व धरणांचे जलाशय यावर प्रामुख्याने सौर ऊर्जा प्रकल्प उभारणी करण्यावर भर आहे. प्रकल्पासाठी घेतलेल्या शासकीय जमीनीसाठी ३० वर्षांच्या कालावधीसाठी नाममात्र वार्षिक एक रुपये भाडे द्यावे लागेल. जमीन उपलब्ध करण्यासाठी राज्य शासनाचा महसूल विभाग, सूत्रधारी कंपनीच्या अंतर्गत स्थापन केलेली कृषी कंपनी आणि महावितरणची यंत्रणा खूप चांगल्या समन्वयाने काम करत आहे. यातून राज्यात हजारो एकर जमीन उपलब्ध करण्यात आली आहे व त्याच्या आधारे पहिल्या टप्प्यातील सुमारे एक हजार मेगावॅट वीजनिर्मितीसाठीची निविदा प्रक्रिया सुरू झाली आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना- २.० याचे धोरण ठरविण्यात राज्याच्या ऊर्जा सचिव आभा शुक्ला यांचे महत्त्वाचे योगदान आहे. या योजनेच्या अंमलबजावणीत महावितरणने आधी तत्कालीन अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल आणि सध्याचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात कौतुकास्पद कामगिरी केली आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना यशस्वी झाली पाहिजे यासाठी शासनाने निश्चित केलेल्या धोरणात अनेक बाबींचा विचार केला आहे. सौर कृषी वीज वाहिनीला उपलब्ध केलेली जमीन अकृषिक (एनए) करण्याची गरज नाही किंवा या जमिनीवर अथवा सौर ऊर्जा प्रकल्पांना महसूल आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या करातून ३० वर्षापर्यंत सूट अशा बाबी निश्चित केल्या आहेत. सौरऊर्जानिर्मिती करणाऱ्या प्रकल्पधारकांना प्रोत्साहनात्मक आर्थिक सहाय्य देण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. ११ केव्ही फीडरवर जोडणी करणाऱ्यास प्रति युनिट २५ पैसे तर ३३ केव्हीवर जोडणी करणाऱ्यास प्रतियुनिट १५ पैसे, तीन वर्षांच्या कालावधीसाठी प्रोत्साहन म्हणून अधिकचे मिळतील असे निश्चित केले आहे. या अभियानासाठी महावितरणची वीज वितरण प्रणाली अधिक बळकट करण्यात येत आहे. महावितरणच्या उपकेंद्रांची क्षमता वाढविण्यासाठी प्रती केंद्र २५ लाख अनुदान दिले जाणार आहे, हा एक महत्त्वाचा अनुषंगिक लाभ आहे.

**(श्री. पाठक हे प्रदेश प्रवक्ते असून 'महावितरण'चे स्वतंत्र संचालक आहेत.)** **(क्रमश:)**

# 'पॅक्स'च्या माध्यमातूनही यापुढे सरकारी कांदा खरेदी

## भाजपा किसान मोर्चाकडून केंद्र सरकारचे आभार



**केंद्र** सरकारने दर स्थिरीकरण योजनेतून (पीएसएफ) करावयाची कांद्याची खरेदी यापुढे विविध कार्यकारी सोसायटीच्या माध्यमातून (पॅक्स) देखील करण्याचे ठरविल्यामुळे शेतकऱ्यांना शासनाच्या कल्याणकारी योजनेचा खऱ्या अर्थाने लाभ मिळणार आहे. आतापर्यंत ही खरेदी केवळ शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या फेडरेशन मार्फतच होत होती. अल्प प्रमाणात सहकारी संस्थांना यंदा या खरेदीचे काम देण्यात आलेले होते.

शेतकरी केंद्रबिंदू ठेवून मोदी सरकारने जाहीर केलेल्या या धोरणाचे भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा प्रदेशचे अध्यक्ष गणेश भेगडे यांनी स्वागत केले आहे. केंद्रीय सहकार मंत्री अमितभाई शाह, ग्राहक कल्याण मंत्री पीयूष गोयल, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ही पॅक्स अर्थात विविध कार्यकारी सोसायटीच्या माध्यमातून शेतमाल खरेदी या शेतकरी हिताच्या निर्णयाबद्दल किसान मोर्चाच्या वतीने प्रदेश सरचिटणीस रवींद्र अमृतकर यांनी राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघ, दिल्लीच्या व्यवस्थापकीय संचालिका श्रीमती ऍनी जोसफ चंद्रा यांचे आभार मानले. राज्यात पीएसएस योजनेतून हरभरा, तूर, मूग तर हमीभाव योजनेतून धान खरेदी होत असते.

या निर्णयामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी केलेल्या उदघाटन पर भाषणात प्रत्येक पाच किलोमीटरला शेतकऱ्यांना आपला शेतमाल विक्रीसाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्याच्या उद्दिष्टाची ही पूर्ती होईल असे श्री. भेगडे यांनी म्हटले आहे. केंद्र सरकारने देशातील सर्व भागातील शेतमालाची सरकारी खरेदी देखील विविध कार्यकारी संस्थांच्या तसेच शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून केल्यास खरेदीमध्ये स्पर्धा निर्माण होऊन शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने लाभ होईल, असा विश्वासही किसान मोर्चाने व्यक्त केला आहे.

या निर्णयामुळे पॅक्सला आपल्या उत्पन्न वाढीसाठी करावयाच्या व्यवसायात हक्काचा व्यवसाय मिळेल तसेच त्यांच्या उत्पन्नात भर पडून आत्मनिर्भर कृषी धोरणाला ही बळकटी मिळेल असा विश्वास किसान मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष गणेश भेगडे यांनी व्यक्त केला आहे. ■

# निर्मळ मनाचा नेता - प्रतापदादा सोनवणे

**२२ डिसेंबर** हा धुळे लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार प्रतापदादा सोनवणे यांचा जन्मदिवस. दुर्दैवाने याच दिवशी त्यांनी इहलोकाची यात्रा संपविली. प्रतापदादांनी कधीही सत्ता वा कसलाही मोह ठेवला नाही. आपले आयुष्य जनतेप्रती समर्पित केले. प्रतापदादांच्या रूपाने वर्तमान राजकरणातील नितांत प्रामाणिक व निर्मळ मनाचा एक देवभोळा माणूस हरपल्याची भावना जनमानसातून व्यक्त केली जात आहे. गेल्या तीन दशकात माझ्यासारख्या अनेकांनी प्रतापदादा सोनवणे यांच्या इतका नेकदिल व जिंदादिल व्यक्ती अनुभवला नाही. एकदा दिलेला शब्द कधीही मोडायचा नाही ही त्यांची जणू आजन्म प्रतिज्ञाच होती. प्रतापदादा सोनवणेंनी सामान्य कार्यकर्त्यालाच राजकारणातील केंद्रबिंदू मानले होते. सलग बारा वर्षे आमदार व पाच वर्षे खासदार राहिलेल्या प्रतापदादांनी सदैव स्वार्थाच्या पलिकडचे राजकारण केले. राजकारणात कोणाशीही छलकपट, दगाफटका त्यांनी कधीच केला नाही. अत्यंत विनम्र, मितभाषी, प्रेमळ व दयावान व्यक्ती म्हणून प्रतापदादा निरंतर जनतेच्या स्मरणात राहतील. जनसंघापासून पक्षाच्या विचारधारेशी एकनिष्ठ राहिलेल्या प्रतापदादांनी शैक्षणिक क्षेत्रात मोठे कार्य केले. राज्यातील दुसऱ्या क्रमांकांची शैक्षणिक संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मराठा विद्या प्रसारक शिक्षण (मविप्र) संस्थेचे अध्यक्ष व सभापती अशी पदे त्यांनी भूषवली होती.

प्रतापदादा सोनवणे यांच्या व्यक्तीत्वाचे मोजमाप केवळ माणूसकीच्या तराजूत केले तर त्यांचे व्यक्तिमत्व खऱ्या अर्थाने समजून घेता येईल. जीवनात आदर, सन्मान व्यक्तीचा करावा की त्याच्या व्यक्तीत्वाचा. व्यक्तीच्या पदाला, आर्थिक श्रीमंतीला मान्यता द्यावी की वैचारिक संपदेला? त्याची जात, धर्म पद-प्रतिष्ठा मोजावी की त्याची नितीमुल्ये? त्याच्या संपत्तीची थोरवी गात रहावी की गुणवत्ता व माणुसकीला श्रेष्ठ मानावे? माणसाचे मोठेपण मोजण्याचे नेमके मापदंड कोणते असतात असा तात्विक व सैध्दांतिक प्रश्न जेंव्हा मनात येतो तेंव्हा या समाजातील परंपरेने रूढलेल्या लब्ध प्रतिष्ठितांची व राजकीय पदासाठी हपापलेल्या लोकांची किंमत



***२००९ मध्ये लोकसभा मतदारसंघाची पुनर्रचना झाल्यानंतर धुळे लोकसभा मतदारसंघातून प्रतापदादांना पक्षाने उमेदवारी दिली. जनसंघापासून संघटनेत कार्यरत असलेल्या प्रतापदादांचा सर्वसामान्य कार्यकर्त्यांशी नेहमीच दांडगा संपर्क होता. विधानपरिषदेच्या पदवीधर मतदारसंघात सलग दोनवेळा विजय मिळवणाऱ्या प्रतापदादांनी धुळे मतदारसंघातही विजयाचा झेंडा सहज रोवला. सामान्य कार्यकर्त्यांना सहजपणे उपलब्ध होणाऱ्या प्रतापदादांनी पक्षनिष्ठेपोटी स्वत:ला समर्पित केले होते.***

प्रतापदादांच्या तुलनेत शून्य भासू लागते. क्षणीक स्वार्थासाठी व खोट्या प्रतिष्ठेसाठी माणसं जेंव्हा जीवाचं रान करतात त्यासाठी सर्वसामान्यांची पिळवणूक करतात, दादा सोनवणेंचा 'पुण्य-प्रताप' मनाला भावतो. पक्षाशी कायम एकनिष्ठ राहणाऱ्या प्रतापदादांनी उत्तर महाराष्ट्रात पक्षाची संघटना बांधण्यासाठी दिलेले योगदान मोलाचे आहे. राजकारणात अनेक सत्ता पदे अखंडपणे भोगूनही प्रतापदादा आयुष्यभर साधे सरळच राहिले.

प्रतापदादांनी खुशमस्कऱ्यांची फौज कधीच आपल्या भोवती उभी राहू दिली नाही. संघर्षाच्या व कसोटीच्या काळात पक्षाचे निष्ठावंत व प्रामाणिक कार्यकर्तेच उपयोगी पडतात यावर ते ठाम होते. राजकारणात स्वत:ला सिध्द करताना इतरांना क्षुल्लक समजणे अशी वृत्ती प्रतापदादांनी कधीच ठेवली नाही. आपली महत्वाकांक्षा सफल होण्यासाठी शह-काटशह करणाऱ्यांच्या रांगेत प्रतापदादा कधीच उभे राहिले नाहीत. ■

# 'महारेल'मार्फत 24 पूल बांधून वाहतुकीसाठी तयार




**केंद्रीय** रस्ते निधी– सीआरएफमधून महाराष्ट्रातील ९१ रेल्वे उड्डाणपूल – आरओबीपैकी ३१ आरओबीचे बांधकाम आपण 'महारेल' महाराष्ट्र शासन आणि रेल्वे मंत्रालयाच्या सहकार्याने चालु असलेल्या सार्वजनिक क्षेत्र उपक्रम कंपनीला दिले आहे. त्यापैकी २४ पूल त्यांनी बांधून वाहतुकीसाठी तयार केले आहेत, अशी माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. महाराष्ट्रातील ९ उड्डाणपूलांचे लोकार्पण तसेच नागपूर शहरातील ५ पुलाच्या भूमिपूजन समारंभ नागपूरच्या नंदनवन येथील केडीके कॉलेजजवळील गोरा कुंभार चौकात पार पडला. याप्रसंगी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महारेलचे व्यवस्थापकीय संचालक राजेश जयस्वाल प्रामुख्याने उपस्थित होते. उद्घाटन झालेल्या ९ उडानपुलामध्ये नागपूर जिल्ह्यातील कन्हान रेल्वे स्टेशन, काटोल रेल्वे स्टेशन, चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा रेल्वे स्टेशन, नाशिकातील खेरवाडी रेल्वे स्टेशन, जळगाव रेल्वे स्टेशन, सांगली जिल्ह्यातील मिरज रेल्वे स्टेशन, भिलवाडी रेल्वे स्टेशन या ठिकाणचे रेल्वे उड्डाणपूल तसेच ठाण्यातील तुर्भे उड्डाणपूल त्याचप्रमाणे मुंबईमधील मानखुर्द येथील उड्डाणपूल यांचा समावेश आहे. या बांधकामासाठी सुमारे ६२९ कोटी रुपये खर्च आला आहे. तर भूमिपूजन झालेल्या नागपूर शहरातील ५ उड्डाणपुलामध्ये रेशीम बाग चौक ते केडीके कॉलेज चौक, चंद्रशेखर आझाद चौक ते मारवाडी चौक लाडपुरा, लकडगंज पोलीस स्टेशन ते वर्धमान नगर बगडगंज, राजेंद्र नगर ते हसनबाग चौक खरबी त्याचप्रमाणे वर्धमान नगर ते निर्मल नगरी यांचा समावेश आहे. या ५ उडानपुलाच्या कामासाठी सुमारे ७९२ कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात आली आहे. याप्रसंगी नागपुरातील विविध विकास कार्याची माहिती देताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले की पूर्व नागपुरात नवीन पारडी उड्डाण पुलामुळे अंतर कमी झाल्याने वाहतूकीचा वेळ वाचत आहे. ■

## आयुष्मान भव ; 12.6 लाख आरोग्य मेळाव्यांना 10 कोटींपेक्षा जास्त लोकांची उपस्थिती

**आयुष्मान** भव कार्ड, आभा कार्डांची निर्मिती, आरोग्यविषयक महत्वपूर्ण योजना आणि असंसर्गजन्य रोग, क्षय, सिकल सेल आदी विविध रोगांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी देशाच्या विविध भागांत १७ सप्टेंबर २०२३ पासून आरोग्य मेळावे भरवण्यात आले. सरकारी योजना, माहितीचा प्रसार, प्रचार आणि आरोग्य कल्याण योजनांचे फायदे थेट जनतेपर्यंत पोहोचवण्याच्या दृष्टीने या मेळाव्यांची आखणी करण्यात आली आहे. अभियानाला सुरुवात झाल्यापासून आयुष्मान आरोग्य मंदिरे आणि सामाजिक आरोग्य केंद्रांमध्ये भरवलेल्या १२.६ आरोग्य मेळाव्यांना १६ डिसेंबर २०२३ पर्यंत१० कोटींपेक्षा जास्त लोकांनी उपस्थिती लावल्याची नोंद झाली आहे. सेच, या काळात १७ कोटींपेक्षा जास्त (१७,२६,६६,८४५) लोकांनी क्षय रोग, उच्च रक्तदाब, मधुमेह, मोतीबिंदू, तोंडाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग व गर्भाशयमुखाच्या कर्करोग आदी सात रोगांच्या चाचण्या करून घेतल्या आहेत. १६ डिसेंबर २०२३ रोजी संपलेल्या आठवड्यात ८६,१९,६३६ लोकांनी या सात रोगांच्या चाचण्यांचा लाभ घेतला आहे. सामाजिक आरोग्य केंद्रांमध्ये ३४,१०७ आरोग्य मेळावे भरवण्यात आले असून त्यामध्ये एकूण १,३७,८४,९५४ लोकांनी नोंदणी केली. एकूण ३,७०,३६,४४५ आयुष्मान कार्डांची निर्मिती आरोग्य मेळाव्यांमध्ये करण्यात आली असून पैकी ४,७८,१६८ कार्डांची निर्मिती या आठवड्यात करण्यात आली. ■

# राज्यात कांद्याची महाबँक



**राज्यात** प्रथमच कांद्याची महाबँक स्थापन करण्यात आली आहे. या प्रकल्पाचा नुकताच प्रारंभ करण्यात आला. ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर हे यासाठी मदत करत आहेत. न्यूक्लिअर तंत्रज्ञानाचा वापर करून कांदा इरॅडिशनचा हा पथदर्शी प्रकल्प कांदा उत्पादकांच्या समस्येवर कायमस्वरुपी उपाय ठरेल. डॉ. अनिल काकोडकर यांनी अणुऊर्जा आधारित कांदा महाबँक, कांदा प्रक्रिया व साठवणूकसाठी सहकार्य करून पुढाकार घेतला. कांदा महाबँकेद्वारे हमीभाव, कांदाविषयक आयात-निर्यात धोरणे आणि बाजारपेठेतील मागणी-पुरवठ्याचा समतोल, या मूलभूत समस्या आटोक्यात आणता येतील. कांद्याचे भाव स्थिर राहात नाहीत. मात्र शेतकऱ्यांकडे कांदा साठवणुकीच्या सुविधा उपलब्ध नसल्याने कांद्याची आवक वाढल्यानंतर कमी किंमतीत कांदा विकण्याशिवाय पर्याय उपलब्ध होत नाही. त्यामुळे राज्य शासनाने ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षेतखाली सुकाणू समिती स्थापन केली आहे. त्या समितीच्या मार्गदर्शनानुसार कांद्याची महाबँक ही संकल्पनाही राबवली जाणार आहे. राज्य सरकारकडून कांदा साठवणुकीसाठी शीतगृह, कांद्याची महाबँक, कांदा चाळींच्या अनुदानात वाढ यासारखे महत्वाचे निर्णय घेतले आहेत. या महाबँकेच्या माध्यमातून १० लाख टन कांदा साठवणुकीची क्षमता उपलब्ध होणार आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या कांदा साठवणुकीच्या आणि दर कोसळल्यानंतर होणाऱ्या नुकसानीपासून दिलासा मिळू शकतो. कांद्याचे बाजार भाव योग्य नसेल तर शेतकरी कांद्याची साठवणूक करतात. यासाठी शेतकऱ्यांकडून कांदा चाळी उभारल्या जातात. अशा कांदा चाळींच्या निर्मितीसाठी येणाऱ्या खर्चावर राज्यशासनाकडून १८% अनुदान दिले जाते. त्या अनुदानामध्ये वाढ करण्यात येणार आहे. त्यासाठी वाढीव निधीची तरतूद करण्यात येणार आहे. कांदा चाळीच्या अनुदानात वाढ झाल्यास शेतकऱ्यांना कांदा साठवणुकीच्या दृष्टीने आर्थिक फायदा होणार आहे. २५ हजार कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा सहभाग असलेल्या हिंदुस्थान ग्रो को-ऑपरेटिव्ह या संस्थेकडून राहुरी येथे कांदा प्रकल्प उभारला जात आहे. हा प्रकल्प केंद्र सरकारच्या 'ऑपरेशन ग्रीन'या योजनेतंर्गत उभारला जाणार असून या प्रकल्पासाठी ११७ कोटी रुपयांच्या निधीस मान्यता देण्यात आली आहे. राज्यातील अनेक शेतकरी आपला कांदा पारंपरिक पद्धतीने चाळींमध्ये साठवतात. मात्र याद्वारे शेतकऱ्यांचा कांदा मोठ्या प्रमाणात सडतो. मात्र आता या विकिरण तंत्रज्ञानाच्या मदतीने कांद्याला विकिरणांच्या संपर्कात आणले जाणार आहे. ■

# नमो महारोजगार मेळाव्यात 11097 उमेदवारांना नियुक्तीपत्रे

**महाराष्ट्र** शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत नागपूर येथे आयोजित नमो महारोजगार मेळावा हा देशात अभुतपूर्व ठरला आहे. दोन दिवसीय या मेळाव्यात ६७ हजार ३७८ उमेदवारांनी नोंदणी केली असून यापैकी ११०९७ उमेदवारांना रोजगार उपलब्ध झाला आहे. नोंदणी झालेल्या उर्वरीत सर्व उमेदवारांच्या नोकरीसाठी शासन पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुलाखतीच्या माध्यमातून काही लोकांना प्रतिवर्ष १० लक्ष रुपयांचे पॅकेज मिळाले असून ही नमो महारोजगार मेळाव्याची फार मोठी उपलब्धी आहे. विशेष म्हणजे विविध कंपन्यामध्ये रोजगार मिळालेल्या ११०९७ उमेदवारांना नाविन्यपूर्ण कल्पनेतून एकाच क्लिकद्वारे नियुक्तीपत्र देण्यात आले आहे. दोन दिवसात ३२८३१ मुलाखती: नमो महारोजगार मेळाव्यात एकूण ६७३७८ उमेदवारांची नोंदणी झाली. यात देशातील नामांकित ५५२ कंपन्यांनी सहभाग नोंदविला तर ३८५११ युवक-युवतींनी सहभाग घेतला. नागपूरचा हा नमो रोजगार मेळाव्याचा प्रयोग यशस्वी झाला असून अन्य विभागात व जिल्ह्यातही हे मेळावे घेण्यात येईल. ■

# सुषमा गोराने यांची ओबीसी मोर्चा महिला सह संयोजकपदी निवड



**नाशिक:** सुषमा गोराने यांची भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा उत्तर महाराष्ट्र महिला सह संयोजकपदी निवड करण्यात आली असून त्यांच्या या निवडीचे पत्र भाजप ओबीसी मोर्चा महिला संयोजिका डॉ.उज्वला हाके यांनी दिले आहे. त्यांच्या या निवडीबद्दल भाजप प्रदेश सरटिचणीस विजय चौधरी, उत्तर महाराष्ट्र संघटन मंत्री रवी अनासपुरे, नाशिक जिल्हा प्रभारी राजेंद्र गावित, भाजपा नाशिक शहराध्यक्ष प्रशांत जाधव, आ. सीमा हिरे, आ. प्रा. देवायानी फरांदे, आ. राहुल ढिकले, प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, लोकसभा समन्वयक गिरीश पालवे आदींनी नवनिर्वाचित कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. ■

# अल्पसंख्याक मोर्चा प्रदेश उपाध्यक्षपदी शेख इब्राहिम



अल्पसंख्याक मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी मालेगाव येथील नगरसेवक शेख इब्राहिम शेख अस्लम यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. मोर्चा प्रदेश अध्यक्ष इद्रिस मुल्तानी यांनी श्री. शेख यांना नियुक्तीचे पत्र दिले आहे. श्री. शेख हे राज्य सरकारच्या राज्य हज समितीचे सदस्य आहेत. ■

# व्दारका मंडल कार्यकारिणी

**नाशिक महानगर- मंडल अध्यक्ष-** सुनिल देसाई, **उपाध्यक्ष-** अवधुत कुलकर्णी, एकनाथ नवले, नितीन कुलकर्णी, सुश्मिता लांडगे, विलास विधाते, संदिप बनकर, रफिक शेख, **सरचिटणीस-** उदय जोशी, दत्ता शिंदे, जितेंद्र चोरडीया, **चिटणीस-** सोपान कदम,नलिनी दराडे, संजय गायकवाड, पुष्पा पाटील, जयवंत पाटील, रविंद्र मुळे, संदिप विसपुते, **कोषाध्यक्ष -** हरीभाऊ जाधव, **कार्यकारिणी सदस्य-**वैभव फेंडर, शाम शिंदे, भुषण काळे, विवेक तर्टे, सचिन कुलकर्णी, संजय व्यवहारे, समिर जामखेडकर, परेश अंतापुरकर, सुनीता मुकणे आदी. ■

# भाजपा महिला आघाडीने २५ हजार परिवारांशी साधला संपर्क

**अकोला** भारतीय जनता पार्टीच्या वतीने महिला आघाडीने शहरातील सहा भागांत वाचन शक्तींच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी वेगवेगळ्या स्पर्धा आयोजित करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या २५७ योजना, बेटी बचाओ बेटी पढाओ या कार्यक्रमाला चालना देण्यासाठी शहरातील २५ हजार परिवारांशी संपर्क साधला. जवळपास हजार स्पर्धकांच्या माध्यमातून जनजागृती व विविध पुरस्कार देऊन प्रमाणपत्र देऊन गौरवांकित करण्याचा कार्यक्रम प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन कमल सखी मंचाच्या सुहासिनी धोत्रे यांनी केले. अकोला भाजपा महिला आघाडीच्या वतीने रांगोळी स्पर्धेच्या कार्यक्रमाचे उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. पूर्व मंडलातर्फे आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी चंदा शर्मा होत्या. मंजुषा सावरकर, पुष्पा खंडेलवाल, सुमन गावंडे, अर्चना शर्मा, अर्चना मसने, सुनीता अग्रवाल, सीमा मांगटे-पाटील, निकिता देशमुख उपस्थित होत्या. छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, अहिल्याबाई होळकर, रमाबाई आंबेडकर, राजमाता सिंधिया, सुषमा स्वराज, प्रमिलाताई टोपले, सुमतीबाई सुकळीकर, सावित्रीबाई फुले, यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. सौ. धोत्रे यांनी भारतीय जनता पक्ष सर्वसामान्यांना सन्मान, स्वाभिमान तसेच प्रत्येकाला सरकारच्या योजनेचा लाभा मिळवून देण्यासाठी कटिबद्ध असून पक्षाने आदिवासी महिलांना संधी देऊन प्रयत्नशील राहू, असा निर्धार केला. ■

# अल्पसंख्यांक मोर्चा संयोजकपदी फैज दळवी

**अल्पसंख्यांक** मोर्चा चिपळूण शहर संयोजकपदी फैज दळवी यांची नियुक्ती करण्यात आली. जिल्हा उपाध्यक्ष आशिष खातू यांनी ही माहिती दिली. यावेळी शहर अध्यक्ष श्रीराम शिंदे, माजी नगरसेवक विजय चितळे, जिल्हा कामगार मोर्चा संयोजक विनोद कदम, जिल्हा प्रसिध्दी प्रमुख संदेश ओक, महिला मोर्चा शहर अध्यक्षा शीतल रानडे, निनाद आवटे, पदवीधर प्रकोष्ठ शहर संयोजक ऋतूज डाकवे, ओबीसी मोर्चा शहर संयोजक प्रणय वाडकर, शहर उपाध्यक्ष महेश कांबळी, अमित ओतारी, भरत परब, सारिका भावे, धनश्री बापट आदी उपस्थित होते. ■

# बेटी बचाओ बेटी पढाओ प्रकोष्ठतर्फे रांगोळी स्पर्धा




**लाखनी (जि. भंडारा) – बेटी बचाओ बेटी पढाओ प्रकोष्ठतर्फे रांगोळी स्पर्धा– उपस्थिती–** डॉ. परिणीता फुके, बेटी बचाओ बेटी पढाओ प्रकोष्ठ प्रदेश संयोजक डॉ. शुभा पाध्ये, धनवंता राऊत, प्रिती डोंगरवार, भूती धकाते, वनिता डोये, वेणू कोटरंगे, कुंता शहारे, लता कापसे, ज्योती सपाटे आदी.



**वर्धा– बेटी बचाओ बेटी पढाओ प्रकोष्ठतर्फे रांगोळी स्पर्धा– उपस्थिती–** आ. पंकज भोयर, बेटी बचाओ बेटी पढाओ प्रकोष्ठ प्रदेश संयोजक डॉ. शुभा पाध्ये, पायल कबरे, नीलिमा ताटेकार, अर्चना वानखेडे, दुर्गा व्यास आदी.

**अकोला– बेटी बचाओ बेटी पढाओ अंतर्गत रांगोळी स्पर्धा– उपस्थिती–** सुहासिनी धोत्रे, मंजुषा सावरकर, पुष्पा खंडेलवाल, सीमा मांगटे पाटील, अर्चना मसने, महिला मोर्चा महानगराध्यक्ष चंदा शर्मा, सारिका जस्वाल, सुनिता अग्रवाल, अर्चना शर्मा, बेटी बचाओ बेटी पढाओ संयोजिका निखीता देशमुख, वंदना पिंपळखरे, चंदना जैन, जान्हवी डोंगरे, चंदा ठाकूर, छाया तोडसाम, रश्मी कायंदे, निशा कढी, निता बागडे, दीपिका ठाकूर, रविता शर्मा, दुर्गा जोशी, संतोष शर्मा आदी.





**चंद्रपूर– उपस्थिती–** वन व सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार, बेटी बचाओ बेटी पढाओ प्रदेश संयोजक डॉ. शुभा पाध्ये, जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, बेटी बचाओ बेटी पढाओ चंद्रपूर संयोजक वंदना आंगारकटे, पायल कब्रे प्रभारी ठाणे, शहराध्यक्ष राहुल पावडे आदी.




**सोलापूर– सुपर वॉरिअर्स बैठक– उपस्थिती–** आ. सुभाष देशमुख, लोकसभा निवडणुक प्रमुख विक्रम देशमुख, लोकसभा विस्तारक नारायण बनसोडे, विधानसभा निवडणुक प्रमुख हणुमंत कुलकर्णी, विशाल गायकवाड, रामाप्पा चिवडशेट्टी, अर्जुन जाधव, आनंद बिराजदार आदी.



**बारामती विधानसभा मतदार संघात माळेगाव येथे पंतप्रधान उज्वला मोफत गॅस योजनेतून सिलेंडर वाटप– उपस्थिती–** प्रमोद तावरे, प्रवीण वाघमोडे, हेमंत काटे, अजिंक्य तावरे, लतेश तावरे, नागेश नरुटे, अजित खोमणे आदी.



**आष्टा व ईश्वरपूर (ता.वाळवा, जि.सांगली) येथे आष्टा व ईश्वरपूर विधानसभेची सुपर वॉरियर्स संवाद बैठक. उपस्थिती–** प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर, हातकणंगले लोकसभा निवडणुक प्रमुख सत्यजित देशमुख, जिल्हाध्यक्ष निशिकांत पाटील आदी.



**सावरगांव तांडा (जि. नांदेड) येथे जलधारा शक्ती केंद्रातील सुपर वारियर व बुथ प्रमुखांची बैठक–** ग्रामीण उत्तर जिल्हाध्यक्ष सुधाकर भोयर, संतोष अडकिने-पाटील, माधव डोखळे, शेषेराव अनंतवार, बापुराव झिंगरे, शेखर पाचपुते, दिगांबर आडे, अनिल पवार, नामदेव पवार, संतोष पेळे.



**छत्रपती संभाजीनगर– पंतप्रधान विश्वकर्मा योजना शिबिर– उपस्थिती–** अनुसूचित जाती मोर्चा प्रदेश प्रभारी राजू भाऊ शिंदे, कैलास वाणी, कृष्णलाल बासनीवाल, राहुल निकम, सुशीलाताई मेहरा, उत्तम बरथुने, बाळू दहितवाल, सुनिल सोनवणे, मनदीप राजपुत, शुभम वाणी, हरीश मेहरा, दिपक रमंडवाल, विनोद बंरडवाल, सुनिल रंमडवाल, विजय मेहरा, सिताराम मेहरा, करण बंरडवाल, विनोद मेहरा, विक्की बताडे.

# माजी आमदार सुरेश लाड भाजपामध्ये



**कर्जत-खालापूरचे माजी आमदार सुरेश लाड यांचा पक्ष प्रवेश- उपस्थिती -** प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी मंत्री पंकजा मुंडे, आ. प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सतीश धारप, वसंत भोईर, दीपक बेहेरे, राजेश भगत आदी. खालापूर पंचायत समिती सभापती नरेश पाटील, संदीप पाटील, श्वेता मनवे, तानाजी चव्हाण, माजी नगराध्यक्ष शरद लाड, राजेश लाड, विजय हजारे, राजू हजारे, जगदीश ठाकरे, देविदास बडेकर, उद्योगपती राम राणे, बिलाल आढाल आदींनीही भाजपमध्ये प्रवेश केला आहे.



**सेलु (जि.परभणी) येथील राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर ताठे, विठ्ठल अंजीराम ताठे, अंबादास रामभाऊ ताठे, नेताजी काशीनाथ ताठे, केशव सोळंके आदींचा पक्षप्रवेश- उपस्थिती-** प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, रामप्रसाद बोर्डीकर, आ. मेघना बोर्डीकर आदी.



**राजापूर- जिल्हाध्यक्ष राजेश सावंत यांच्या नेतृत्वात जैतापूर येथे पक्षप्रवेश- उपस्थिती-** साहिल भाटकर, निलेश पालकर, गजानन मांजरेकर, शैलेश मांजरेकर, संदीप शिंदे, संतोष मौर्य, किरण आंबेलकर, ऋतिक माजरेकर, नारायण नार्वेकर, ओमकार पाटकर आदींनी पक्षप्रवेश केला. हा पक्षप्रवेश करून घेण्यात सिकंदर करंगुटकर, तालुका अध्यक्ष यांचा मोठा वाटा होता.



**अल्पसंख्यांक मोर्चा महाराष्ट्र प्रदेशच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची प्रथम कार्यकारिणी बैठक नागपूर येथे झाली. उपस्थिती-** प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, अल्पसंख्यांक मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष जमाल सिद्दीकी, कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुल्तानी, हज कमिटीचे अध्यक्ष आसिफ पठाण, अनिल सोले, मोर्चाचे मुंबई अध्यक्ष वसीम खान, जुनेद खान, सलीम जहांगीर, एजाज शेख.



**कराड (जि.सातारा) विकसित भारत विकास रथ- उपस्थिती-** प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर, जिल्हा सचिव दिपाली खोत, सुनील दळवी, राजेंद्र लोहार, चंद्रकांत कदम, अतुल जगदाळे, बापूसो लोहार, जोतीराम भांडवले, प्रजोत कदम. यावेळी लाभार्थ्यांना 'आयुष्यमान भारत कार्ड' वाटप करण्यात आले.

**वर्धा- पदवीधर प्रकोष्ठ आणि शिक्षक आघाडी संघटनात्मक बैठक- उपस्थिती-** जिल्हा अध्यक्ष सुनील गोपाळ, पदवीधर प्रकोष्ठचे प्रदेश संयोजक धनराज विसपुते, शिक्षक आघाडी प्रदेश संयोजक डॉ. प्रशम कोल्हे, अनिल शिवणकर, अर्चना वानखडे, प्रदीप गौतम, विशाल उराडे, नरेश कामडे, सुधीर अनवाने, विनोद नाकाडे, योगेश धाडसे आदी.





**नागपूर– उद्योग आघाडीच्या विकसित भारत विकास रथाचा प्रारंभ– उपस्थिती–** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उद्योग आघाडीचे प्रदेश संयोजक प्रमोद वाकोडकर, मराठवाडा संयोजक संजय कावडे, निमेश सावे, विठ्ठल जपे, प्रशांत देशपांडे, मिलिंद यंबल, सतीश सोमाणी.



**ठाणे– उद्योग आघाडीचा विश्वकर्मा योजनेच्या प्रसारासाठी विकास रथ– उपस्थिती–**आ. निरंजन डावखरे, गोरक्ष धोत्रे, उद्योग आघाडीच्या महिला प्रदेश संयोजिका सेजल कदम आदी.




**मुंबई–** उद्योग आघाडीच्या विकास रथाचे उद्घाटन आ. प्रसाद लाड यांच्या हस्ते झाले. राज्यातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात हा विकास रथ नेण्याची योजना आहे. उद्योग आघाडीचे प्रदेश संयोजक प्रमोद वाकोडकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा रथ काढण्यात आला आहे.



**अल्पसंख्याक मोर्चाची सुफीसंवाद बैठक– उपस्थिती–** अल्पसंख्याक मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष जमाल सिद्दिकी, मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष इद्रिस मुलतानी, मुंबई अध्यक्ष वसिम खान, उत्तर प्रदेश अल्पसंख्याक मोर्चाचे माजी अध्यक्ष चाँद अब्बास, जुनेद खान, एजाज शेख, रिदा रशिद, सुफी संवादचे राष्ट्रीय प्रभारी आबेद अली, राज्याचे संयोजक सलिम बागवान, हज कमिटीचे सदस्य अफजल दावदानी आदी.

# प्रदेशाध्यक्षांचा लोकसभा प्रवास




**फलटण येथे माढा लोकसभा मतदारसंघातील सुपर वॉरिअर्स मेळावा– उपस्थिती–** खा.रणजीतसिंह नाईक–निंबाळकर, आ.जयकुमार गोरे, सातारा जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम, प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ, माढा लोकसभा प्रभारी प्रशांर परिचारक, प्रदेश सचिव नवनाथ पडळकर आदी.




**फलटण येथे मुस्लिम बांधवांकडून श्रीरामाची प्रतिमा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना भेट देण्यात आली.**



**संपर्क से समर्थन– अकलूज–प्रख्यात हृदयरोगतज्ज्ञ डॉ. एम.के. तथा अरुण इनामदार यांची भेट– उपस्थिती–** प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आ.रणजीतसिंह मोहिते–पाटील, माढा लोकसभा प्रभारी प्रशांत परिचारक, आ.राम सातपुते आदी.




**पंढरपूर– उपस्थिती–** प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, खा.सिद्धेश्वर स्वामी, आ. समाधान अवताडे.



**सोलापूर– नगरसेवक येमूल यांचा पक्षप्रवेश– उपस्थिती–** प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, माजी सहकार मंत्री सुभाष देशमुख, आ.विजय देशमुख आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp













प्रति,

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com